मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



प्रा. वामनराव चोरघडे

चंद्रपूरच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

युगवाणी

डिसेंबर, १९७८ – जानेवारी, १९७९.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साभार पोच

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशन	पृष्ठे	मुल्य
					रुपये
१.	सुमती वुक स्टॉल	शरच्चंद्र टोंगो	नागपूर प्रकाशन, सीतावर्डी नागपूर	१२०	१०
२.	आमूलाग्र	पु. य. देशपांडे	–,,–	१५५	१५
३.	गीतवर्षा	वि. शा. काळे (वावुलनाथ)	काळे व्रदर्स पब्लिकेशन, ६० सोमवार पेठ, पुणे-११	१०२	५
४.	अगर मैं भारत का प्रधान मंत्री होता (हिन्दी)	द्वारकाप्रसाद, 'आर्य'	स्वस्तिका प्रकाशन १३।१ सैयदशालीलेन, कलकत्ता-७३	१५०	१२
५.	आश्लेशा	मालती निमखेडकर	माग्रस प्रकाशन, धनतोली	५०	४
६.	झरोका	श्यामकांत कुळकर्णी	–,,–	५६	४
७.	प्रवर्तक	गौतम शिंदे	गौतम सुभाना शिंदे, टागोर नगर १।२५०, ३३५८, मुंवई-८३	३६	५
८.	डॉ. आंवेडकर आणि धर्मक्रांती	वसंत मून	डॉ. आंवेडकर रिसर्च इस्टिट्यूट, नागपूर	५८	५
९.	रायवरेली आणि त्यानंतर	वि. स. वाळिंबे	श्री विद्या प्रकाशन २५० क।१६ शनिवारपेठ, अष्टभुजादेवी रस्ता, पुणे-३०	१८०	२०
१०.	ज्वाला	विश्व. लक्ष. कालेकर	विश्व. लक्ष. कालेकर, जुनी गंज, उदगीर	२४	२
११.	मधुवाणी	प्रभाकर पुराणिक	अमेय प्रकाशन, रुईकर मार्ग, महाल, नागपूर-४४०००२	७४	४.५०
१२.	हासपरिहास	सुभाष भेंडे	–,,–	११७	१५
१३.	खुदू खुदू	वसंत मिरासदार	–,,–	११६	१५
१४.	नाटयवेध	डॉ. द. भि. कुळकर्णी	नूतन प्रकाशन, २१८१ सदाशिव पेठ, पुणे-३०	१२९	१०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ विषयः सारस्वती जयतु

युगवाणी

डिसेंबर, १९७८–
जानेवारी, १९७९
मार्गशीर्ष-पौष, १९००

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये) (वर्ष ३४, अंक ९-१०

संपादक–मंडळ :
सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, बजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. बा. कुंडले

संपादकीय

अ. भा. मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष प्रा. वामनराव चोरघडे

चंद्रपूर येथे दि. ५, ६ व ७ जानेवारी, १९७९ रोजी भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्रेपन्नाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी नामवंत साहित्यिक प्रा. वामन कृष्ण चोरघडे यांची बहुमताने निवड झाली आहे. एक आघाडीवरचे कथाकार म्हणून वामनरावांची विशेष ख्याती आहे. तसेच लोकसाहित्याच्या क्षेत्रातील त्यांची कामगिरीदेखील लक्षणीय आहे. वा. चोरघडे आणि आचार्य काकासाहेब कालेलकर या दोन मान्यवर साहित्यिकांनी केलेले लोकसाहित्याचे संकलन, संपादन व अध्ययन यांचा उत्तम परिपाक म्हणजे त्यांचे 'साहित्याचे मूलधन' होय.

लोकसाहित्याच्या आस्वादनातील मर्म विशद करताना वामनराव चोरघडे यांनी पुष्कळ वर्षांपूर्वी लिहून ठेवले आहे :— "इथे कुशल कल्पनाविलास पाहावयाचा नाही, अभ्यास करून डोके खाजवून उमटलेला अर्थगौरव पाहायचा नाही किंवा पंधरा पंधरा मिनिटे विचार करून करून लिहिलेल्या प्रत्येक शब्दामधून पदलालित्याचा खोज घ्यावयाचा नाही. इथे फक्त एकच गोष्ट पाहावयाची आहे व ती म्हणजे— दाटून आलेल्या असीम भावनांची उसळी. लोकगीतांच्या निर्मितीचे हे सिंहासन मयूरपिच्छांनी जरी सुशोभित केलेले नसले तरी निष्पाप, प्रामाणिक व शुद्ध जीवनरसाने ते धुतलेले असते."

साने गुरुजी, वि. वा. जोशी, चिं. ग. कर्वे, पं. महादेवशास्त्री जोशी, दुर्गा भागवत, सरोजिनी बाबर, कमलाबाई देशपांडे, मालतीबाई दांडेकर, वि. कृ. जोशी, नामदेव व्हटकर, प्रभाकर मांडे इत्यादींच्या कामगिरीमुळे हे लोकसाहित्यविषयक अभ्यासाचे दालन आता अतिशय समृद्ध झालेले आहे. तरीदेखील चोरघड्यांच्या 'मूलधना'ने बजावलेले ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य दुर्लक्षिता येणार नाही.

अ. भा. म. सा. संमेलनाध्यक्षपदी निवडून आल्यावर प्रा. चोरघडे यांचे नागपुरात दोन सत्कार-समारंभ झाले. दि. २५ डिसेंबर रोजीच्या वि. सा. संघातील सत्कारप्रसंगी डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री. आ. रा. देशपांडे ऊर्फ कवी अनिल, डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. श्रीधर शनवारे आणि प्रा. अनंत अडावदकर यांची भाषणे झाली. दि. २६ डिसेंबरला राजाराम सी. दी. वाचनालय (सीताबर्डी)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येथील समारंभात डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सौ. सीमा साखरे, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, डॉ. सुनील सुभेदार व प्रा. र. वि. रानडे यांची वामनरावांच्या गुणगौरवपर भाषणे झाली. या दोन्ही सत्कारसमारंभप्रसंगी उत्तरादाखल प्रा. चोरघडे म्हणाले,—"माझ्या कथेत सूक्ष्मता व संस्कारक्षमता आहे असे आपण म्हणता. जे गुण माझ्यावर लादण्यात येतात त्याची कल्पना मला नाही. कथालेखनाची साधना मात्र मी इमाने इतबारे केली. कलेसाठी कला या भूमिकेतून मी लिहिले आहे. वास्तविक माझी आकांक्षा पहेलवान होण्याची होती ! लिहिणे हा माझा काही धंदा नव्हता. माझ्या जेवढ्या कथा आहेत तेवढ्या लोकांना वाचू द्या आणि त्यांनाच आपले स्वतःचे मत बनवू द्या. माझा जोम कायम आहे. वर्षातून तीन कथा ही माझी सरासरी अद्यापही कायम आहे. मात्र, लेखक खूप झाले आहेत आणि त्यामानाने वाचक कमी झाले आहेत हीच माझी खरी व्यथा आहे."

मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी वि. सा. संघातील समारंभात सांगितले, "ज्याने साहित्यात आपले सर्व आयुष्य खर्च केले आहे व ज्याचे नाव स्थिर आहे असा अध्यक्ष हवा. निदान त्याची पंचवीस वर्षे साहित्यिक कामगिरी असणे उचित ठरेल. कथेला नवे वळण देणाऱ्या चोरघडे यांना या वयात अध्यक्षपद मिळू द्यावयाचे नाही तर त्यांना तसेच जाऊ द्यावयाचे काय ? विख्यात विनोदी लेखक चि. वि. जोशी आणि इतिहासकार गो. स. सरदेसाई यांना संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या बहुमानाला मुकावे लागले याबद्दल वाईट वाटते. वामनराव चोरघडे यांची निवड त्यांच्या साहित्य-गुणांमुळेच झाली. कथालेखनाच्या इतिहासात त्यांना महत्त्वाचे स्थान असून श्री. चोरघडे यांनी आपले युगप्रवर्तकत्व सिद्ध केले आहे."

प्रा. चोरघडे यांनी पुसद येथे १९६४ साली भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले होते. आता त्यांना विदर्भातच चंद्रपूर नगरी मराठी साहित्याच्या क्षेत्रातील अध्यक्षपदाचा सर्वश्रेष्ठ मान लाभला आहे. वामनरावांचा एक स्नेही व चाहता या नात्याने व्यक्तिशः मी त्यांना या आनंदाच्या प्रसंगी नम्र अभिवादन करतो.

अंतरंग

सहा लेख :— श्रीधर शनवारे, श्री. वामनराव चोरघडे—२०९, देवीसिंग व्यं. चौहान, सिंहली-लिहिल-इहिल—२११, हरिश्चंद्र थोरात, रात्र काळी घागर काळी—२१६, श्रीकांत महाजन, तुकारामाच्या काव्यप्रतिमा—२१८, भा. त्र्यं. परांजपे, श्रीकृष्णाची गीता किती ?—२२०, वि. बा. प्रभुदेसाई विभक्तिविमर्शाच्या संदर्भात 'पंचमी' आणि 'सप्तमी'—२३१.

एक कथा :— चित्रा वि. पांढरकर, पान्हा—२१३.

चार ग्रंथ परीक्षणे :— सुरेश गउरकर, तणावा—२२३, दिलीप देशपांडे, गाभारा—२२६, श्री. रा. सिरास, मी तुळस तुझ्या अंगणी—२२८, मंगल देसाई, अलेक्सांद्र पुश्किन-समीक्षेची समीक्षा२२–९.

सात कविता :— सगुणा पुजारी, निखाऱ्यांना कोळसे करणाऱ्यांनो, लँगस्टन ह्यूज; अनु. बी. रंगराव, (तीन कविता), (१) निग्रो नद्यांविषयी बोलतो आहे (२) बर्मिंगहॅम सण्डे (३) गाणं ... आत्महत्येसाठी. श्रीकृष्ण राऊत, डोक्यावर जुलमी आभाळ. धर्मराज निमसरकर गस्त घालणारे डोळे. सुरेश गांजरे, आलेख. नरेंद्र बोडके, अत्यंत. सुभाष सावरकर, स्वप्नपक्षी.

याशिवाय साभार पोच, कार्यवृत्त इत्यादी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीधर शनवारे / श्री. वामनराव चोरघडे

"चोरघडे, लघुकथेच्या क्षेत्रात तरी ज्याच्याकडून अपेक्षा करावी असा लेखक, तुम्ही सोडून दुसरा कोणी मला आज दिसत नाही," असे उद्‌गार, श्री. ह. वि. मोटे यांनी वामनरावांविषयी काढले होते. त्या गोष्टीला आता त्रेचाळीस वर्षे होऊन गेली. चोरघड्यांचा पहिला कथासंग्रहसुद्धा तेव्हा प्रसिद्ध झालेला नव्हता. 'काचेची किमया', 'आणभाक', 'विहीर' अशा काही कथा तेवढ्या वाचकांसमोर तुरळकपणे आलेल्या होत्या. आणि तेवढ्यावरूनच एक नवीन शैलीचा, गडद जीवनानुभवाचा व काव्यात्म वृत्तीचा कथाकार महाराष्ट्र शारदेची कूस धन्य करायला प्रकट झाल्याची जाणीव चोखंदळ रसिकांना त्याकाळी झाली होती.

त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९३६ साली चोरघड्यांचा 'सुषमा' हा पहिला कथासंग्रह बाहेर पडला. त्या काळच्या बहुतेक सर्वच समीक्षकांनी या संग्रहाला कडेखांद्यावर घेतले. ग. त्र्यं. माडखोलकरांनी त्यातील मार्दवाची स्तुती केली, निशिकांत खानोलकरांनी त्यातील अभिजात सच्चेपणाची वाखाणणी केली, प्रभाकर माचव्यांनी त्यातील भावनाविलासाची भलावण केली — आणि अशा कित्येकांनी केलेल्या कौतुकात चोरघड्यांची कथा पुढे फुलत गेली.

हे फुलणे अजूनही संपलेले नाही. चोरघड्यांच्या कथापुष्पाला जणू न सुकण्याचा आशीर्वादच कुण्या वाङ्मय-देवतेकडून लाभलेला आहे! चोरघडे अद्यापही-आजही कथालेखनात रंगून गेलेले आढळतात. पासष्ठीत पदार्पण केलेल्या वामनरावांना आता स्वतःच्या हाताने लिहिता येत नाही; त्यांची शरीरप्रकृती त्यांना हवी तशी साथ देत नाही; त्यांच्या पत्नीच्या मृत्यूपासून आणि खांडेकर, फडके, माडखोलकर यांच्यासारख्या त्यांच्या निकटच्या ज्येष्ठ मित्रांच्या निधनापासून त्यांचे मनही झाकोळलेल्या सूर्यासारखे अधूनमधून कसनुसे होऊन जाते. पण या सर्व आधी-व्याधींना निर्धाराने बाजूला करून चोरघडे अजूनही कथा लिहितातच आहेत. गांधीजींनी एकदा विनोबांना म्हटले होते, "अरे विनोबा, तू असा दुबळा दिसतो आहेस. तुला एवढी कामे झेपतात कशी ?" विनोबांनी गांधीजींना चटकन उत्तर दिले होते, "महात्माजी, मी इच्छाशक्तीने काम करतो, अंगशक्तीने नाही !" चोरघडे स्वतःला विनोबांचे शिष्य मानतात त्यातला भावार्थ अशा वेळी अचानक लक्षात येऊन जातो.

चोरघड्यांचा 'ख्याल' हा अकरावा कथासंग्रह अलीकडे, म्हणजे १९७३ साली प्रसिद्ध झाला. आणि त्यानंतरही त्यांचे कथालेखन थांबलेले नाही. 'धरतीचा वसा', 'नंदिता', 'साद', 'संबंध', 'स्वयंसिद्धा', 'प्रसाद', 'मनपाखरू : कायाझाड' अशा एकाहून एक सरस कथा चोरघडे अजून लिहिताना दिसतात. एकदा खटयाळपणे मी त्यांना विचारले, "बापूसाहेब, आज नवकथा इतकी सर्वांगांनी विकसित होत असताना तुम्ही तुमचे कथालेखन कशाला चालू ठेवलेले आहे ? आजच्याही परिस्थितीत तुम्ही मराठी कथेला काही नवीन शक्ती देताहात असे तुम्हांला वाटते काय ?" वामनराव थोडा वेळ थांबले. कसले तरी औषध त्यांनी वाटीत ओतले होते. ते घशाखाली उतरवले. मग मला म्हणाले, "तसा काही अभिनिवेश माझ्यात नाही. मला काही विशेष जाणवले आणि ते लिहून घेणारे कोणी लगेच सापडले तर मी ते सांगून टाकतो, एवढेच. आता दावा कसलाच राहिलेला नाही. पूर्वीही मी कधी कशाचा दावा केलेला नाही."

चोरघड्यांचे म्हणणे खरे आहे. १९६० साली 'सत्यकथे'तून त्यांचे जे आत्मनिवेदन प्रसिद्ध झालेले होते त्यातही त्यांची विनम्र भूमिका मला जाणवली होती. 'कथेच्या क्षेत्रात चोरघड्यांनी नवा पायंडा पाडला, नवकथा चोरघड्यांपासून सुरू झाली' वगैरे निष्कर्ष एका नव्हे अनेक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभ्यासकांनी काढलेले आहेत. पण चोरघड्यांनी या विरूदांचा कधी गर्व वाहिला नाही. उलट ते म्हणाले, "लेखनक्षेत्रात मी माझी पावले टाकीत असताना मला रडता पडता कडेवर उचलून घेणारी मंडळी लाभली हे मी माझे पूर्वसुकृत समजतो. एरवी असे भाग्य लाभायला या जन्मी मी काहीच केले नव्हते."

कथा या वाङमयप्रकाराची आजन्म एकनिष्ठपणे व विनम्रपणे सेवा करण्याचे व्रत घेतलेला हा कलावंत आता चंद्रपूरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून निवडला गेला आहे. हा परिसर चोरघड्यांना व चोरघड्यांच्या कथांना खूप परिचयाचा आहे. त्यांची 'जूलिया' इथलीच ! त्यांची 'अम्मा' ही इथलीच ! 'सव्वापाच आणे', 'वस्तूचे मूल्य', 'पोर', 'मानव्याच्या दिशा', 'कलाविलास' अशा कितीतरी कथांच्या जन्मखुणा या मुलुखात सर्वत्र विखुरलेल्या सापडतील. मराठीला, चोरघड्यांच्या माध्यमातून, उत्तमोत्तम कथा देणारे मायपोट या मातीला लाभलेले आहे. हे या मातीचे देणे तिच्या पायी ठेवून व तिला पुन:पुन्हा प्रणिपात करून चोरघडे या संमेलनाहून परततील, असे मला वाटते. पावसाळ्यात पाणी जरी गच्चावरून पडल्यासारखे वाटत असले तरी ते आभाळातून पडत असते, त्याप्रमाणे आपल्याला साहित्य जरी एखाद्या साहित्यिकाचे आहे असे वाटत असले तरी ते खरोखर त्या मातीचे असते.

इतरांना होवो न होवो, चोरघड्यांना मात्र हा नाळ-संबंध मान्य होईल. कारण 'यौवन' या कथासंग्रहाच्या सुरूवातीला त्यांनी या गंधवती, क्षमावती धरित्रीची करुणा भाकताना लिहिले आहे—

'त्वं च धारय मां देवी पवित्रं कुरुचासनम्'

⊕ ⊕ ⊕

नवी प्रकाशने

विअरची सहा कॅन्स □ कथासंग्रह □ नरेश □ अठरा रुपये ✸ 'लोभ असावा' आणि 'एखादयाचा मृत्यू' □ दोन लघुकादंबऱ्या □ मनोहर शहाणे □ सतरा रुपये ✸ उच्छाद □ कादंबरी □ त्र्यं. वि. सरदेशमुख □ वीस रुपये ✸ उथव □ प्रवास लेख □ रा. भि. जोशी □ वीस रुपये ✸ सलाम □ कवितासंग्रह □ मंगेश पाडगावकर □ दहा रुपये ✸ मातृका □ कादंबरी □ पु. शि. रेगे □ साडेतेरा रुपये ✸ डॉ. पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन □ चरित्र □ द. न. गोखले □ चाळीस रुपये ✸

संपूर्ण सूचीसाठी आजच कार्ड टाका

मौज प्रकाशन गृह
मुंबई–४०० ००४

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

देवीसिंग व्यं. चौहान / सिंहली – लिहिल : इहिल¹
(मूळ लेखक–राल्फ्. एल्. तर्नर)

वर्ड या नियतकालिकात खंड ३, पृष्ठे ८२–८३. पी. तेदिस्को याने, संस्कृत **शियीर**-शब्द पूर्वीच्या ***श्रृथिर** – शब्दापासून व्युत्पन्न आहे; याचे याविषयी मान्सिओन् याने **एस्क्विस्से द उ ने हिस्तोइर द ल लांग्वे संस्कृत**. पृ. १३१ ग्रंथात आणि कुइपर याने **अॅक्ता** ओरिएन्तालिया, खण्ड २०, पृ. ३३१ मध्ये. व्यक्त केलेल्या शंकांचे निरसन करीत, समर्थन केलेले आहे. अशी कल्पना येऊ शकते की ऋग्वेद संहिता सिद्ध होण्याच्या काळी, ऋ या स्वराला, विशिष्ट परिस्थितीत, इ ध्वनीचे रूप प्राप्त झाले होते, आणि या शब्दातील र–घटक, पूर्वगामी **श** च्या प्रभावामुळे, लोप पावलेला होता. तेदिस्को याने ह्या युक्तिवादाला पाठिंबा दिला आहे. त्याने असे दाखविले आहे की –इथ–<–ऋथ– हा विकास, ऋ + दन्त्य या संयोगामुळे, केवळ एखाद्या विशिष्ट बोलीतील विकास होय, आणि वस्तुस्थिती तशीच आढळते. जसे सर्वज्ञात आहे, मध्य भारतीय भाषांत संस्कृत **ऋ इ** रूपाने अवतरतो (किंवा कधी कधी ओष्ठ्यांच्या सान्निध्याने उ– रूपाने) किंवा त्याचा **अ**)[2] बनतो आणि पश्चात्क दन्त्य व्यंजन दन्त्य राहाते किंवा त्याचे मूर्धन्य ध्वनीत रूपान्तर होते. 'ढिले' अर्थाच्या शब्दात निश्चितपणे हाच बदल आढळतो, आणि तेदिस्को याने सुयोग्य रीतीने दाखविले आहे की पालीतील सिथिल व सठिल– आणि प्राकृतातील सिढिल व **सढिल** या रूपांतील इ / अ यांच्या विकल्पाला ऋ ध्वनि पूर्वगृहीत आहे, नामशः संस्कृत * श्रृथिर–ल. दन्त्य व मूर्धन्य यांच्यातील विकल्पही तसाच अर्थपूर्ण आहे. ऋ आणि ऋ आधिक्य दन्त्य यांच्या इतिहासातील समभाषा रेषांत, बोलीबोलीतील शब्दांच्या उसनवारीमुळे, वरीच सळमिसळ झालेली दिसून येते. तरीपण, **ऋ** अधिक दन्त्य याचा **अ** अधिक दन्त्य असा विकास मराठी भाषेत सामान्य, निदान प्रभावी असल्याचे जे. ब्लोक **ल लाँग्वे** मराठे, पृष्ठ ४७, ११७ याने दाखवून दिलेले आहे. म्हणून येथे मराठी **सहिल, सैल, 'ढोले'** यावरून पूर्वरूप ***सठोल्ल**–दन्त्यासह, याचा पुरावा उपलब्ध होतो व तो महत्वाचा ठरतो. हेच शुद्ध मराठी रूप असून सढळ 'उदार', 'अवाच्या सवा' < प्राकृत **सढिल**— ही उसनवारी आहे.

सिंहलीत **ऋ** ध्वनींचा नियमित विकास **अ** असा होतो, आणि तदुत्तर दन्त्याचा मूर्धन्य ध्वनी बनतो : उदा. **कृत–हृत–मृत**– > कळ, अळ, मळ : अधिक उदाहरणे दव्ल्यू. गायगर, ए ग्रामर ऑफ द सिंहलीज लँग्वेज, पृ. ३१)[1] आणि पी. बी. एफ् विजेरत्ने, बुलेतिन एम. ओ. ए. एस., खण्ड ११, पृ. ८३६ वर पाहावीत.

इ (किंवा **उ**) < **ऋ** सन्निहित शब्द आणि तदुत्तर दन्त्याचा लोप ही, निःसंशयपणे, शेजारील आर्यभारतीय भाषांतील सिंहलीभाषी लोक भारत सोडून जाण्यापूर्वीची, किंवा बहुसंख्येने पाली या धर्मभाषेतून उसनवारी होत; जसे, **अंग**–< सं. श्रृंग याखेरीज सिंग 'शिंग' हा शब्द पालि **सिंग**– याची उसनवारी होय. सिंहली इहिल 'ढिले' शब्द याच वर्गातील आहे. गायगरने, **सिंहलीज** एतिमॉलॉजी, पृ.–२४ तो प्रत्यक्षतः सं. शिथिल शब्दापासून व्युत्पादिला आहे आणि तेदिस्को, **पूर्वोक्त**, याने स्पष्टपणे ***श्रृथिर**–पासून; परंतु, वस्तुतः तो

---

१. जर्नल ऑफ् द सीलोन ब्रँच ऑफ द रायल एसियातिक सोसायटी, न्यू सेरीज, १९५५, पृ. ७३–५.

२. अशा प्रकारचा पुरावा उपलब्ध होतो की एखाद्या व्यंजनानंतर हा इ/उ विकार किंवा अ मध्यगत अवस्था रि/रु पासून उद्गत होतो, अशा व्यंजन जोडाक्षर असलेल्या काही बोलींत र शेष राहातो व इतर ठिकाणी तो लोप पावतो, उदाहरणार्थ **पृच्छति**, निय कागदपत्रात **प्रिछति, प्रुछति**, काश्मीरीत **प्रिछून**, आणि **निराकृत**–, प्राकृतात **निरक्किय**–सुरवातीला अशा वेळी भिन्नता होती, उदा. **ऋक्ष**– प्राकृतात **रिक्ख–रिच्छ**, तसेच **अच्छ** आणि ***इक्ष**–(पिना इछ, इत्यादी).

३. विजेरत्ने, बुलेतिन एस. ओ. ए. एस्. ११, ८३६ *अणय हा णय 'कर्ण' याचे अनंतरीय पूर्वरूप याप्रमाणे न व्युत्पादिता, निष्कारण *इणय<ऋण– असे व्युत्पादन गायगर याने दिले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पालि सिथिल शब्दाची उसनवारी आहे. व हे आद्य स– ध्वनीचा ह–ध्वनि द्विस्वरान्तर्गत –थ– ध्वनीचा – ह– बनण्यापूर्वी घडून आलेला आहे.

*श्रृथिर– शब्दाचा खरा सिंहली वारसा **लिहिल** शब्द आहे. या शब्दाची अनेक स्पष्टीकरणे झालेली आहेत. जे. ब्लोक, **ल लँग्वे मराठे**, पृ. ३४३ याने हा शब्द व **इहिल** याची प्राकृत **ढिल्ल** याच्या गटाशी तुलना केली आहे[४]; परंतु आद्य **ड–ढ–** ध्वनीचा सिंहलीत **ड** होतो; उदा. **डा** < डाक– गायगर, सिंहलीज ग्रामर, पृ. ८८ प्रक्रियेची अधिक व्याख्या न करता, लिहिल– मधील आद्य ल सवर्णा-पत्तीमुळे आला असे म्हणतो, परंतु, सिंहली एति-मॉलॉजी, पृ. २४, ग्रंथात त्याने सुचविले आहे की हा शब्द इहिल– असून त्यावर **लुहु**– 'प्रकाश' शब्दाचा प्रभाव पडलेला आहे.

तेदिस्को, पूर्वोक्त, याने लिहिल–– असा व्युत्पादिला आहे; *श्रृथिर– > *श्रिथिर – > *श्लियिल– > *लिहिल– यामुळे सिंहलीतील ध्वनिविकास–– नियमांकडे दुर्लक्ष झालेले आहे. (१) **ऋथ**– अल् आणि (२) श्ळ– > स् किंवा शक्यत: सिल–, परंतु ल–नव्हे : उदा. सेम 'शेंब'< श्लेष्मन्, सोव 'गाणेगात' < श्लोक,– त्याचप्रमाणे सिलिटु–'स्पर्शणे', सिलुठु '–ला चिकटणे', सिलोक 'श्लोक, गीत' हे संभवत: पाली भाषेतून सिलिट्ठ–, सिलोक– यांची उसनवारी आहेत.

तरीपण, लिहिल–हा खरा *श्रृचिर शब्दाचा सिंहली वारसा आहे. त्यातही तेदिस्को याने गृहीत धरल्याहून भिन्न अशा मध्यगत अवस्था दिसून येतात. *श्रृथिर– > सढिल– (हा पुरावा एका पाली रूपात सापडतो) > सढिल– (प्राकृतातील, विशेषत: अर्धमागधीतील पुरावा) > *हढिल– > *हिळिल–> *ळिहिल– > लिहिल *हळिल पासून झालेला *हिळिल हा बदल नियमानुसार आहे; कारण अ स्वराच्या पुढे इ आल्यास, त्याचा इ ध्वनी होतो: पाहा, गायगर, सिंहली ग्रामर, पृ. २३, व विजेरत्ने, बुलेतिन एस्. ओ. ए. एस्. १२, पृ. १७६ ह आणि पुढील ध्वनीत दिसणारे व्यंजन यांचा वर्ण विपर्याय ही नित्याची बाब आहे, आणि गायगरने, पूर्वोक्त, पृ. ८९, पुढील प्रकारची ७ उदाहरणे दिली आहेत. लह 'निमंत्रण पत्रिका' < *हल < शलाका, मुहुदु 'सागर' *हुमुदु < समुद्र यास लिहिल)[५] याचा जोड देता येते.

सारांश हा की लिहिल हा अस्सल सिंहली शब्द आहे, आणि प्राकृत व आधुनिक भाषांतल्या, मराठी रूपांप्रमाणे, तो *श्रृथिर– या मूळाकडे अंगुलिनिर्देश करतो; याच्या सिथिल–या पालि वारसापासून सिंहलीतील इहिल– हा दुसरा शब्द उसणवारीने आला आहे.

---

४. प्राकृत ढिल्ल– (*ढिल–सिंधीत ढिरों) याचा प्राकृत सढिल/इढिल याच्याशी संबंध जोडण्याला काही आधार आहे असे नाही. हा शब्द आर्य भारतीय भाषांत सर्वत्र आढळतो. (पहा:–नेपाली शब्दकोश, पृ. २६६ ब, १२) आणि कदाचित् *ढिल्ल 'ढेकूळ' याच्याशी सम्बन्धित आहे, बंगालीत ढिल 'ढेकूळ', मैत्रिली ढील 'उ', मराठी ढील 'ढेरपोट' आणि *ढेल्ल 'ढेकूळ' जो सर्वत्र आढळतो (पाहा:– नेपाली शब्दकोश शब्द ढेल) तेथे उद्धृत शब्दाला याची जोड देता येते, पशइ **डल** अनेकवचनाचा प्रत्यय, काश्मीरी **डेल**, 'ढेकूळ', भलेसी **ढेल्ल**, कुमायूनी **ढेलो**, भोजपुरी **ढेलवांस** 'गोफण' (<*ढेल्लपाश–) : ताडून पाहा आंग्ल लुम्पिश 'भिऱ्यासारखा मंद, रेंगाळणारा निष्क्रिय (एन्. ई. डी.) प्राकृत **ढेल्ल**–साठी पाहा:–हेमचंद्र देशी नाममाला ४, १६ यात केवळ 'अधन' असा अर्थ दिलेला आहे.

५. हा वर्णविपर्याय नेपाली शब्दकोश, पृ. २६६ ब २० मध्ये यापूर्वी सूचित करण्यात आलेला आहे. हे शक्य आहे की ल, लय 'हिय्या' < हृदय– शब्दात असाच वर्ण-विपर्याय असल्याचे दिसून येते. (*हल– >लह– >ल) आद्य ह मधील ह ध्वनीचा लोप होण्याच्या, अस्पष्ट, पण संभवनीय, लोपांची येथे शक्यता नाही.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चित्रा विनायक पांढरकर / पान्हा

चर्चच्या आवारातले क्रुस लगटून उभे होते. जीझसची मूर्ती प्रसन्न वाटत होती. आय हॅव कम फॉर द सीनर्स ! सेंटस् हॅव पास्ट अँड सीनर्स द फ्युचर ! ! त्याचे ओठ पुटपुटत होते का ? ती तल्लीन झाली होती. त्याने हलकेच तिच्या खांद्याला स्पर्श केला. "घरी चलायचं नं ?" "अंह्हो."—ती.

उंच झाडांखालून स्कूटर पळत होती. ती उगीचच डोके उंचावून वर बघत होती. आणि साऱ्या झाडांवर क्रुसावरचे जीझस दिसायला लागले. हिरवी गर्द उंच झाडे; बॅकग्राउंडला आभाळ, स्टीलचे क्रुस आणि प्रत्येकावर हात पसरलेला येशू दिसत होता. एकुलती वाट अन पळती स्कूटर. ती काळजीपूर्वक एकेक निरखीत होती. ह्या निरखण्याला स्कूटरच्या वेगाचा अडथळा होत होता आणि प्रथमच तिला प्रकर्षाने जाणवले आपण पायी यायला हवे होते. "जरा हळू चालव ना. हा रस्ता संपूच नयेसं वाटतंय," ती म्हणाली. स्कूटर थांबली. तो उतरला. तिच्या खांद्यावर हात रोवून तिच्या डोळ्यात त्याने निरखून बघितले. तीही त्याच्या डोळ्यात आसूसून बघत राहिली. तिच्या मागच्या झाडांवर बसलेले जीझसच त्याच्या डोळ्यात हसत होते. तिने नजर उंचावून वर बघितले. समोरच्या झाडांवर शांतपणे जीझससकट क्रुस लटकत होते. त्याच्या डोळ्यांतल्या प्रतिबिंबातले मागचे जीझस मात्र हसत आहेत. कां ?

स्कूटर पुन्हा पळायला लागली. तिचे निरखणे सुरूच होते. आणि लख्खन वीज चमकावी तसा एक रिकामाच क्रुस तिच्या डोळ्यांसमोरून मागे गेला. अचानक कसलीशी हुरहुर, जाग, आगळा भाव तिच्या उरात दाटला. त्या क्रुसाने आपल्याजवळ येण्यापेक्षा आपण त्याच्याजवळ जायला हवे असेच काहीसे तिला सतत जाणवत राहिले. तो वाट पाहात लटकत रिकामाच उभा आहे. साऱ्या क्रुसांना जीझसची सोबत मग हा एकटाच कां ? क्रुसावर लटकायलाही योग्यता लागते. ख्रिस्ताइतकीच ! ! !

कुठलेसे साताठ वर्षांपूर्वी बघितलेले एक चर्च तिला आताही आठवले. उंच. बूटहाउससारखे. आवारात दोन लाकडांवर टांगलेली मोठ्ठी घंटा. वाजवण्याचा मोह मनात नेहमी निर्माण करणारी. ती जड घंटा ह्या लाकडांना पेलतेच कशी असा संभ्रम तिच्या मनात निर्माण व्हायचा. तिथे असताना ती सारखी मेरीच्या बसलेल्या उंच मूर्तीपाशी जाऊन उभी राह्यची. ती एकटीच उन्हातान्हात, पाण्या-पावसाची, दिवसरात्र घंटेच्या आधाराने जगत होती. तिला मेरीचे कौतुक वाटायचे. छे ! एकटी कशी ? तिच्या हातात तिचे तान्हे होते ना !

आणि आता स्कूटरवर बसलेल्या तिला जाणवलं आपण नक्की मेरीसाठी तिथे थांबत होतो की. की जीझससाठी ! जीझसमुळेच ना मेरीला महत्त्व प्राप्त झाले की मेरीच्या पुण्याईने तो तिच्या पोटी आला ? ती दचकली. मेरीबद्दल आपल्याला नक्की काय वाटत होते ? आदर, प्रेम की असूया ? हाताला रंग लागेल, जोजवून मांडी दुखेल आणि कुणीतरी ह्याला घ्यावे असे क्षणभरासाठीतरी मेरीला कधीतरी वाटेल ह्या आशेने नाहीका मी तिथे उभी राह्यची ? चर्चमध्ये जाण्याऐवजी म्हणूनच तर त्या आवारातल्या मेरीपाशी तासन् तास उभी राह्यची—तान्हयुल्याकडे बघत त्याला घेण्यासाठी हातांचा पाळणा तयार ठेवत. मेरीच्या स्वच्छ डोळ्यांत एखादीतरी कंटाळवाणी छटा दिसतेय का हे आतुरतेने बघत.

चारदोनदा मैत्रिणीने दिलेले पेरूही तिने तिच्या पायाशी ठेवले होते—मेरी पेरू घ्यायला वाकेल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि निसटलेल्या जीझसला घ्यायची संधी चालून येईल म्हणून. मेरीला कधी भूक लागतच नसेल का ? की माझ्या मनातले भाव जाणून मी निघून गेल्यावर तिने पेरू खाल्ले असतील ? नुस्त्या प्रेमानेच पान्हा फुटतो ? मग मला. मला प्रेम वाटत नाहीय ? मी तर साऱ्यांवर प्रेम करते आणि त्याच्यावर त्यांच्यावरून सारा जीवच ओवाळून टाकलाय. त्याच्या विषयीचे प्रेम तिच्या हृदयात आताही दाटून आले. गळा भरून आला. छातीत किंचितशी धडधडही झाली. सांज नादावली होती. सोबतीला निशीगंध होता. तिने त्याच्या कमरेभोवतीचा हात अधिकच वेढून घेतला. ती सादावली. 'शिरीन' तिला खूप खूप बोलायचे होते. पण गळा दाटून आला होता. "काय म्हणतेस शोनी ?" तो विचारात होता पण तिला कळलेच नाही. ती गुंगून गेली होती. दुतर्फा उंच झाडं आणि एकट रस्ता असल्याने तिने उजवीकडून आपले डोके त्याच्या भरदार खांद्यावर विसावू दिले होते.

शिरीनशिवाय दुसरे काहीच मनात नव्हते. आणि पुन्हा तोच रिकामा क्रूस तिच्या दिशेने झेपावला.

: शिरी, लवकर बघ. आपल्या बरोबर क्रूस येतोय.

: कुठेय ?

: हा बघ स्कूटरच्या अगदी समांतर येतोय. त्याला काहीच दिसत नव्हते. त्याने स्कूटरचा वेग वाढवला. ती दोघंही घरी येऊन पोहोचली. थोडीशी दमल्यासारखी होऊन ती पलंगाच्याकडेला टेकली. तो कपडे बदलीत होता. अन ती आनंदी स्वरात म्हणाली, "अय्या, आपल्या घरातही तो आलाय." आता मात्र तो दचकला. हिला काय झालंय ? तिचे चर्चबद्दलचे वेड त्याला ठाऊक होते. तिची लहर लागली की म्हणूनच दोघेही चर्चमध्ये जाऊन येत. त्यालाही चेंज म्हणून बरे वाटायचे. रस्ताभर तिची चिव-चिव ऐकत तो फुलारून जायचा. गर्द झाडांची संगत लाभायची. न बघितलेले पक्षी पाहायला, ऐकायला मिळत. जर्द हिरव्या रानराजीतले गर्द निळे पक्षी डोळ्यांत घेऊन मग ती त्याच्या रंगात रंगायची.

"मला त्याला मिठी घालायची खूप इच्छा होतेय रे. अगदी मनापासून." त्याला काय बोलावे ते समजलेच नाही. तो तिच्या केसांवरून मुकाट्याने हात फिरवीत तिला निरखीत राहिला. ती थोडीशी सावरली. पायावर पाणी घेऊन देवाला हळद-कुंकू वाहून तिने कुंकवाचे बोट कपाळावर टेकवले. उदबत्ती व दिवा लावून प्रार्थना झाली. आपल्याच नादात तिनं स्वयंपाक केला. दोघांची जेवणंही झालीत. तिचा क्रुसाचा विषय संपत नव्हता.
: क्रुसांना फक्त रक्ताचीच भूक असते का रे ?

: शोनी तू दमलीस. झोप बरं आता. ती अगदी खळखळून हसली.

: तू झोप. मला झोपच येत नाहीय. अन दमायचं कशाला ? स्कूटरवरून तर गेलो न् आलो. त्याने बळेच तिला निजती केली. तोही तिच्याशेजारी लवंडला. अशीच दहापाच मिनीटं गेलीत अन तिने त्याला विचारले, "झोप लागलीय ?"

: "होय" ती नेहमीसारखी प्रसन्न हसली.

: मग तुला एक गंमत दाखवायचीय.

: कोणती ?

: तो क्रूससुद्धा झोपलाय आता.

: कुठय ग ? इंटरेस्ट असल्यागत.

: हा बघ आपल्या पलंगावर तरंगत झोपलाय.

: तो झोपलाय ह्याला काय पुरावा ?

: हे बघ, ज्या व्यक्तीच्या गळ्यात क्रॉस असतो ना ती व्यक्ती बसली किंवा उभी राहिली तर अॅट दॅट टाईम क्रॉस रिमेन्स इन व्हरटीकल पोझीशन. अन जेव्हा ती व्यक्ती झोपते म्हणजेच आडवी होते तेव्हा क्रॉस आल्सो गोज फ्रॉम व्हरटीकल टू इटस् हॉरिझॉण्टल पोझीशन. फॉलोड. ? प्राध्या-पकाच्या आविर्भावात प्रश्न.

त्यानेही तत्परतेने मान डोलावत 'यस मॅडम' म्हणून रिस्पॉन्स दिला.

हाताची कोपरं गादीत रुतवीत तो पालथा झाला. एक हात हनुवटीखाली आधाराला घेऊन दुसऱ्या हाताने तिच्या केसांच्या बटा तो सावरीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहिला. तिच्या चेहऱ्यावरचे भाव क्षणाक्षणाला बदलत होते. ती एकदम उठून बसली. तोही. ती त्याच्याकडे बघत होती मग म्हणाली, "गिरी, तो इथून गेला. त्याच्यावर जीझस का नव्हता माहितेय ?" "नाही बुवा", तो. ती "त्य ऋसानंच मला कानात सांगीतलं" "काय" ? त्याने उत्सुकतेने विचारले. "जिझस तुझ्याजवळ आलाय म्हणे", अन ती एकदम लाजली. त्याला कळलंच नाही. "म्हणजे काय ? कसा ? "

"माझी प्रार्थना फळाला आली रे. मेरीनं आपण होऊन त्याला माझ्या ओटीत घातलंय. तो माझ्याजवळ आहे. अगदीजवळ. इथं माझ्या कुशीत. ती हळुवारपणे सांगत होती. तिचे डोळे निळे निळे दिसत होते. लालरंग तिच्या गोऱ्यापान कांतीभर फाकला होता. त्याने एकदम तिला गच्च मिठीत घेतलं— तिला कुठे ठेवू असं त्याला झालं.

इवल्याला नाजूक हातापायांच्या काल्पनिक स्पर्शानंही तो हेलावला. त्याची तिच्या भोवतीची मिठी अधिकच दृढ झाली. तिच्यासाठीच क्रॉस-वरून उतरून आलेल्या इवल्याला ती कौतुकाने, वात्सल्याने झुलवत राहिली. तिलाही आता पान्हा फुटणार होता.

⊕ ⊕ ⊕

मराठी आडनाव कोश

आडनावे हा मराठी भाषिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असून मराठी आडनावाच्या विकासाची कथा अत्यंत मनोरंजक आहे. भारताच्या इतर कोणत्याही प्रदेशात आडनावांची इतकी विविधता सापडत नाही. या विविधतेतच महाराष्ट्र संस्कृतीचे वैशिष्टच आहे. महाराष्ट्रात विविध जाती, वंश व अनेक संस्कृती यांचे आगमन व मिश्रण झालेले आहे. या मिश्र संस्कृतीचा प्रभाव आडनावांवरही झालेला दिसतो. मराठी आडनावाचा विकास गतिशील व वैशिष्टचपूर्ण आहे. इतर राज्यांच्या तुलनेने मराठी आडनावाचा कोश अत्यंत समृद्ध व गौरवशाली आहे. या आडनावांमध्ये महाराष्ट्राची भाषा व संस्कृती प्रकट झालेली आहे. डॉ. रामगोपाल सोनी हे 'वृहद् मराठी आडनांव कोश' तयार करीत आहेत. त्यांना वाचकांनी आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांची/सदस्यांची आडनावे, आपल्या जिल्ह्याची मतदातासूची/वाचनालयातील सदस्यांची सूची पाठवून उपकृत करावे अशी विनंती आहे. 'वृहद् मराठी आडनाव कोशा'त येणाऱ्या प्रत्येक आडनावासमोर त्या आडनावाची जात, उपजात, गोत्र, कुल, मूळस्थान आणि आडनावाचा उगम व शोध यांचाही इतिहास नमूद करण्यात येणार आहे हे लक्षात घेऊन माहिती पाठवताना शक्यतो प्रत्येक आडनावासमोर वरील माहिती द्यावी. परंतु ही तपशीलवार माहिती देणे शक्य नसल्यास केवळ आडनावे तेवढी पाठवून सहकार्य देण्याची कृपा करावी.

पत्रव्यवहाराचा पत्ता :—

डॉ. रामगोपाल सोनी,
मराठी आडनाव कोश कार्यालय,
४१, डागा लेआऊट, उत्तर अंबाझरी मार्ग,
नागपूर–१०.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

"रात्र काळी घागर काळी ।
यमुना जळेंही काळी वो माय ।।१।।
बुंथ काळी विलवर काळी ।
गळां मोती एकावळी काळी वो माय ।।२।।
मी काळी कांचोळी काळी ।
कांस कांसिली ते काळी वो माय ।।३।।
एकली पाणीया नवजाय साजणी ।
सवें पाठवा मूर्ति सावळी वो माय ।।४।।
विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी ।
कृष्णमूर्ति बहु काळी वो माय" ।।५।।

प्राचीन मराठी साहित्यात संतांनी लिहिलेल्या अभंगांचे एक आगळेच स्थान आहे. परमेश्वर-भेटीसाठी आतुरलेल्या भाविक मनाच्या 'अंतरीचे धावे' या अभंगांच्या रूपाने 'स्वभावे बाहेरी' आलेले आहेत. त्यासाठी संतांना शब्दांची आटाआटी करावी लागली नाही. जे व्यक्त करावयाचे आहे, ते (अर्थ) 'बोलाची वाट न पाहता' सहजसुलभ-रीतीने त्यांच्या अभंगांतून प्रकटले. या अभंगां-मधून संतांच्या आध्यात्मिक वाटचालीचे आलेख जसे पाहावयास सापडतात तसेच लौकिकातील, अलौकिकातील त्यांना आलेले अनुभव हे जाणि-वांच्या, संवेदनांच्या पातळीवरून मूर्त झालेले जाणवतात. स्थूलमानाने संतांच्या जीवनातील आध्यात्मिक प्रवास हा मुमुक्षू, साधक नि सिद्ध अशा क्रमाने झालेला आढळतो. त्यातही साधक नि सिद्ध अवस्थांमधील परमेश्वरभेटीची त्यांना लागलेली तळमळ, दर्शन होत नसल्यामुळे जीवाची होणारी जीवघेणी तडफड, परिणामी निराशेपोटी येणारी अगतिकता आणि शेवटी कसाला उतरून झाल्यावर (आत्मसाक्षात्कारानंतर) त्याच जीवाला लाभलेली अननुभूत धन्यता यांची संवेदनशील स्पंदनेच अभंगवाङ्मयातून प्रकर्षाने प्रतीत होतात. कधी ही स्पंदने विठ्ठलाच्या आर्त आळवणीतून बोलतात तर कधी कृष्णगोपींच्या लीलांतून खेळताना दिसतात. कधी 'आपुलाचि आपणासि' होणाऱ्या संवादातून साकारतात तर कधी "आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे" होऊन ब्रह्मानंदी समाधी लावतात.

प्रस्तुत अभंग हा नामदेवांच्या 'श्रीकृष्णलीला'-वर्णनपर अभंगांपैकी एक आहे. कृष्णाचा नटखट-पणा, गोपिकांशी केलेल्या रासक्रीडा, गवळ्यांच्या मुलांबरोबर खेळलेले खेळ, प्रसंगोपात्त केलेली साहसे इत्यादींची जिवंत भावचित्रे नामदेवांनी मोठ्या हळुवारपणे शब्दांचा कुसुमी कुंचला वापरून चित्रिलेली आहेत. त्यातही अशा ७९ अभंगांत प्रस्तुत अभंग अनेक दृष्टींनी अर्थपूर्ण आहे.

या अभंगात नामदेवांनी एका साजणीचे भावचित्र रेखाटलेले आहे. ही साजणी म्हणजे नामदेवांच्या मनाची एक विशिष्ट अवस्था! जेवढी उन्मनी तेवढीच संवेदनशील. ही मनो-वस्थाच या संपूर्ण अभंगातून मूर्त झालेली आहे. परमेश्वरप्राप्तीच्या मार्गावरील त्यांच्या मनाची ती एक छवी आहे. या छवीचा रंग अंतर्बाह्य काळा आहे अन् तिचा साजन सावळा आहे. काळ्या-सावळ्या रंग-संवेदनांची ही स्पंदने अभंग-भर आंदोलत राहतात. काळा-सावळा यातील फरकही मोठा विलोभनीय आहे. काळेपणाचे पूर्व रूप म्हणजे सावळेपणा. म्हणजे या दोन्हीही भावात (काळेपणाच्या व सावळेपणाच्या) फरक हा गर्दतेच्या गर्दपणाच्या तीव्रतेचा आहे. काळ्या रंगातील गर्दता कमी केली तर सावळे रूप लाभावे नि सावळ्यात थोडी गर्दता ओतली की काळेपणा ल्यावा.

'रात्र काळी घागर काळी ।
यमुनाजळेही काळी वो माय'

या चरणातील भावसौंदर्य अप्रतिम आहे. साधारणतः रात्रीच्या वेळी नदीचे पाणी काळे दिसते. पण इथे यमुनाजळ हेच मुळी काळेशार आहे. त्यात रात्रही काळी आहे. म्हणजे यमुना

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जळाच्या काळेपणातील गर्दता ही अधिकाधिक तीव्रतर होत जाणारी आहे. हे दर्शविण्यासाठी इथली रात्र काळी आहे. यमुनाजळ काळे आहे. जल हे अचेतन. पण इथे यमुनाजळ प्रवाही आहे. प्रवाहित्व हा त्याचा धर्म आहे. हे प्रवाही जल साजणीला घागरीत भरायचे आहे. ती घागर अचेतन आहे. म्हणजे अचेतन यमुनेतील प्रवाही पाणी अचेतन घागरीत भरायचे आहे. पाणी घागरीत भरले की ते अप्रवाही होणार! यातून निर्माण होणारा संवाद–विरोधी लय मोठा अर्थपूर्ण आहे. यमुना अचेतन, घागर अचेतन यातील संवाद आणि यमुनाजळाचे प्रवाहित्व नि घागरीतील जळाचे अप्रवाहित्व यातील विरोध अेकमेकांना तोलून धरतात नि त्यातून एक सौंदर्याकृती निर्माण करतात. या अभंगातील सौंदर्याचा जो घाट प्राप्त झाला तो असा. या अभंगातील यमुनाजळाचा प्रवास हा अचेतनत्वाकडून अचेतनत्वाकडे झालेला आहे. आणि जळही अचेतनच आहे. म्हणजे अचेतनाचा अचेतन-त्वाकडून अचेनत्वाकडे झालेला हा प्रवास आहे. यातील संवाद नि विरोधाचा एक आलेख पुढील-प्रमाणे काढता येईल —

अचेतन यमुना—अचेतनत्व
अचेतन घागर—अचेतनत्व > संवाद

यमुनेतील जळ—प्रवाहित्व
घागरीतील जळ—अप्रवाहित्व < विरोध

[ही सृष्टी पंचमहाभूतात्मक आहे. (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) सृष्टीतील जडाजड त्यातूनच निर्माण झालेले आहे. भासात्मक सजीवत्व नि भासात्मक निर्जीवत्व हे पंचभूतात्मक आविष्कार आहेत. सजीव प्राणी (पशू, पक्षी, वनस्पती, मानव) चैतन्यशील आहेत. म्हणजे पंचभूते ही चैतन्यशील आहेत. म्हणून चैतन्यातून आकारणारे सजीव-निर्जीवात्मक ते सर्व शेवटी चैतन्याकडून चैतन्याकडेच जाणारे असते असाही अेक अर्थ काढता येईल.]

या अभंगातील साजणी काळी आहे. घागर काळी आहे. यमुनाजळ काळे. साजणीची बुंथ काळी. बिल्वर काळे, गळयातील अेकावळीसुद्धा काळी. काचोळी काळी. कमरेवरचे वस्त्र काळे. आणि ज्यावेळी यमुनेवर पाणी भरायला जायचे आहे ती रात्र (वेळही) काळीच! नामदेवांनी या संपूर्ण अभंगात अशाप्रकारे काळ्या रंग-संवेदनांचे अेक संमेलनच भरविलेले आहे. संवेदनांचा हा आविष्कार चैतन्याने रसरसलेला आहे. प्रत्येक संवेदना ही अंतर्बाह्य फुलून आलेली आहे. घागर, बुंथ, बिल्वर, अेकावळी, काचोळी, कमरेवरचे वस्त्र ह्या सर्व लौकिक सृष्टीतील दृश्य जड वस्तू. त्या साऱ्या या अभंगात चैतन्यमय झालेल्या आहेत. साजणीच्या स्वभावाचा अविभाज्य भाग बनलेल्या आहेत.

नामदेवांची ही साजणी यमुनेवर 'पाणिया अेकली' जाण्याला तयार नाही. 'सावळी मूर्ति सवे पाठवा' म्हणून सांगते. सावळ्या कृष्णुलीची सोबत तिला पाहिजे आहे. यातही तिला कावा साधायचा आहे. प्रिय कृष्णुलीला सोबत न्यायचे नि अेकरूप होऊन घरी परतायचे! ही अेकात्मता मोठी अर्थपूर्ण नि प्रसादपूर्ण आहे. तिच्यात एक सुसंगती आहे. प्रस्तुत अभंगातील क्रमशः १, २, ३ या चरणांतील 'काळी वो माय' या शेवटाने त्या त्या चरणातील पूर्वोल्लेखित काळेपणा गर्द गर्द होताना दिसतो. तसेच अनुक्रमे १, २ आणि ३ या चरणांतील यमुनाजळ, गळयातील मोत्यांची अेकावळी व कमरे-वरील वस्त्र यांतील काळी गर्दता उत्तरोत्तर तीव्र होत जाते नि चवथ्या चरणातील सावळेपणा जवळ येऊन क्षणकाल थांबते. चवथ्या चरणातील सावळयाला आपल्यात सामावून घेऊन पाचव्या चरणात पुन्हा संपूर्ण काळी होऊन त्याच स्वरूपात स्थिरावते. चवथ्या चरणातील सावळा कृष्ण पाचव्या चरणात 'कृष्णमूर्ति बहु काळी वो माय' असा संपूर्ण काळा बनतो. यातून ध्वनित होणारा अेकात्मरूपाचा भाव म्हणजे साक्षात् अद्वैत! जिवाशिवाचे मीलन!

नामदेवांच्या उन्मनावस्थेतील भाव-भावनांच्या ताण्या-बाण्यातून साजणीचा हा अेकरंगी पट प्रस्तुत अभंगातून आकारलेला आहे. आणि हे सर्व नामदेवांनी रंगसंवेदनेच्या पातळीवरून अभिव्यक्त केलेले आहे. यातच नामदेवांचे अलौकिक कवित्व सामावलेले आहे.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुकारामांची उपमेय-सृष्टी व उपमान-सृष्टी ह्यांची पराकोटीची एकरूपता आपल्याला जाणवते. त्यांच्या अभिव्यक्तीतील उत्कटता व उद्रेकात्मता ज्या सत्यप्रत्ययातून जन्मते, त्याच अंतिम पारमार्थिक सत्याच्या प्रत्ययातून तुकोबांची प्रतिमासृष्टी साकार पावते. त्यांच्या काव्यात प्राय: विरोध-लयावर आधारलेली अनुभवघटकांची संघटना ज्यात असते, अशा प्रतिमांची उदाहरणे अधिक आहेत. विरोधलयामुळे त्या अभंगांची परिणाम-कारकता अधिक भेदक, उत्कट, व तीव्र होते.

'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास।
कठीण वज्रास भेदू ऐसे'॥
'सुख पाहता जवापाडे।
दु:ख पर्वता एवढे'॥
'कडुनिंबाचिया झाडा।
साखरेचे आळे॥'

सिद्धान्तात अध्यात्म व दृष्टान्तात प्रपंच (व्यवहार) ही ज्ञानेशांची हातोटी तुकारामाच्या प्रतिमासृष्टीतदेखील सर्वत्र दिसते. अंतिम सत्याचा शोध, व अनुभूतीची व्यवस्थिती साधणाऱ्या मन:-प्रक्रियेचा एक धर्म म्हणून ही प्रतिमासृष्टी आपोआप अवतरते. तिच्यात प्रयत्नांचा भाग नसतो. तुकोबांच्या प्रापंचिक प्रतिमासृष्टीचे अंतिम सत्य शेवटी पारमार्थिक असते. प्रसंगी त्या त्या प्रतिमा पुनरुक्तीने आल्या तरी त्यांची परिणामकारकता उणावत नाही. शिळेपणा त्यात जाणवत नाही; त्यांची टवटवी वाळत नाही. याचे कारण तुकोबांच्या विकसनशील व्यक्तिमत्वाचे आपल्याला जाणवत असलेले आकर्षण होय. कवीची प्रतिमा-सृष्टी ही त्याच्या 'स्व'ची, 'अहंची, पिंडाची व प्रकृतीची निदर्शक असते. तुकोबांचे विवेकशील स्पष्टवक्ते व सर्व जीवन-व्यवहारांच्या अगदी तळाशी असलेले सारभूत तत्त्व क्षणात अन्तरभेदी दृष्टीने जाणून घेणारे व्यक्तिमत्त्व त्यांच्या प्रतिमा-सृष्टीतून आपल्यापुढे साकारत असते. भावोत्कटता व बुद्धिवाद यांचा विलक्षण एकरस व मनोहर मेळ तुकोबांच्या प्रतिमासृष्टीतून आपल्याला जाणवतो. त्यात संवेदनचित्रे, शब्दनिष्ठ अलंकार फारसे नाहीत. त्या प्रतिमा विविधतेने व व्यापकतेमुळे आपले अवधान वेधून घेतात.

त्यातून सूचित होत असलेल्या सार्वकालिक जीवनसत्याच्या जिवंत दर्शनाने आपण हरखून जातो. त्या प्रतिमा अनेकदा पुरेशा रेखीव नसतात. ज्या स्वरूपात जशा म्हणून स्वभावत: त्या प्रगट होतील त्याच स्वरूपात ते त्यांना प्रगट होऊ देतात. त्यावर सफाईचा वा संस्करणाचा हात फिरलेला नसतो, कारण 'अंतरिचे धावे स्वभावे बाहेरी, आवरीता परी आवरेना' हीच त्यांच्या काव्यनिर्मितीची व प्रतिमानिर्मितीची प्रक्रिया आहे. तुकोबांचा भावविकास व कवित्वविकास ही एक स्वाभाविक सहजात संगती आहे. त्यांचे अभंग हे अनुभवाचे खडे बोल आहेत. त्यातून व्यक्त होणारी जीवनव्यवहारासंबंधीची समज ही अनुभवापोटी जन्मलेली व सहज आहे. जीवन व्यवहारात लपलेले सत्यच जणू ते शोधीत असावेत असे वाटते. त्यांच्या वाणीत विलक्षण रोख-ठोकपणा निश्चितपणा, नि:संदिग्धता व आत्म-श्रद्धा दिसून येते. परंतु आत्मप्रौढीचा व अहंनिर्दोपित्वाचा दर्प मात्र दिसून येत नाही. म्हणून उपदेशकाचा आव आणून ते बोलत आहेत असे आपल्याला जाणवत नाही. अभंगवाणीतून प्रगट होणारा उपदेश म्हणजे साक्षात्काराचे खडे बोलच आहेत. त्यांच्या चिंतनातून जन्मास आलेली ती विचारमौक्तिके होत. रूपक, उपमा, दृष्टांत इत्यादींचा उपयोग करून ते बोलत असतात. आपल्याला जे जाणवले ते स्पष्ट करावे असाच त्यांच्या प्रतिमांचा वापर आहे. 'रवि रश्मीकळा नये ये काढता निराळा। तैसा देव झाला सकळ'

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही त्यांच्या बोलण्याची नेहमीची पद्धती. उपमा-दृष्टांतांनी त्या स्वाभाविक व अधिक बोलक्या वाटतात. अभंगांतील उपमा-दृष्टातांना त्यामुळे काव्यात्मता प्राप्त होते. त्या अनुभवापासून विलग न होता अनुभवाचाच एक भाग बनतात. त्यांचे साधनरूप नाहीसे होऊन त्यांस साध्याचेच रूप प्राप्त होते. 'झाला प्रेतरूप शरिराचा भाव' या-सारख्या श्रेष्ठ प्रतीचा अध्यात्मानुभव व्यक्त करू पाहाणाऱ्या अभंगामध्ये अनुभव हाच प्रतिमारूप बनत जातो. वाङमयधन लोकधनाच्या पदाला नेऊन पोहचण्याचे भाग्य फारच थोड्यांच्या वाट्याला येते. ते तुकोबांना लाभलेले आहे. तुकारामाच्या अभंगातील कितीतरी चरण, शब्द-प्रयोग, कल्पना व भाषाप्रयोग आपल्या हरघडीच्या बोलीभाषेत अवतरलेले आहेत. त्यातील काहींना तर सुभाषितांचा दर्जा प्राप्त झालेला आहे. 'मोले घातले रडाया, नाही आसू आणि माया.' 'कोडियाचे गोरेपण। तैसे अहंकारी मन, ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला.' 'दया, क्षमा, शांति तेथे देवाची वसति.' 'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूति.' 'जे का रंजले, गांजले त्यांसी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा', 'निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेचि फळ' हे भाषाप्रयोग मायबोलीशी एकजीव झालेले आहेत. अशी शेकडो वचने व सुभाषिते त्यांच्या अभंगांतून विखुरलेली आपल्या दृष्टोत्पत्तीस येतात. ही सर्व वचने प्रतिमागर्भ असून त्यांचे बोलकेपण अर्थपूर्ण प्रतिमांमुळे शतपटींनी वाढलेले आहे. तुकोबांची वाणी अस्सल मराठमोळी आहे. ती शाल-शिष्टांची भाषा नाही. सुसंस्कृतपणाचा ती आव आणीत नाही. आपले सर्व सामर्थ्य ती लोक-भाषेतून घेते. त्यांच्या अभंगांत अगोदरच देखण्या असलेल्या लोकभाषेला अधिकच देखणेपण येते. तिच्यातील मूळचा ठसकेबाजपणा अधिकच वाढतो. ती भाषा मुळातच लयबद्ध असल्याने तिच्यात एक प्रकारची गेयता येते. तिला स्वत:चा अन्तर्गत ताल असतो. भाषेच्या अंगभूत श्रुतिसौंदर्याचा ते सफाईदारपणे वापर करून घेतात. प्रतिमांतून बोलणाऱ्या तिच्या प्रकृतीला ते अधिकच उठाव देतात.

मूर्त अनुभवांना शब्दरूप देताना, अमूर्त शब्द-तरंगांनाही ते व्यक्त करितात. त्यांचे अभंग म्हणजे साक्षात आलेले अनुभव. त्या अनुभवांतून जन्मलेले विचारतरंग वा भावचिंतन ह्यांचे एक-समयावच्छेदेकरून दर्शन घडविण्यात तर त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या अभंगवाणीचा प्राण म्हणजे तिच्यातील प्रबळ आत्मनिष्ठा. ह्या आत्मनिष्ठेमुळेच त्यांच्या वाणीला काव्यात्मता व प्रत्ययकारकता प्राप्त होते. अभंगवाणीतील शब्द कानांवर पडत असताना तिच्यातून व्यक्त होणाऱ्या भाव-विचारांचा प्रामाणिकपणा आपल्याला जाणवतो. अंगभूत प्रांजलपणा मनाला पटून वाणीचे शब्द हृदयाला जाऊन भिडतात.

तुकारामांचे अभंग सकृद्दर्शनी आत्मप्रकटी-करणार्थ जन्मलेले आहेत. आपण लेखन करीत आहोत ह्याची कलाहीन जाणीव त्यांस नाही— 'आपुलिया . बळे नाही मी बोलत, सखा कृपावंत वाचा त्याची'. अलंकरणाला व शब्दपांडित्याला त्यात फारसा वाव नाही. मूळच्या अनुभवाच्या आकलनात व आविष्कारात ज्या प्रकारची दक्षता तुकाराम घेत असतो, तशीच ती तो उपमान-सृष्टीच्या आकलनात व आविष्कारात घेत असतो. तुकारामाचे दृष्टांतच पुष्कळदा अधिक आकर्षक व म्हणून अधिकच स्मरणसुलभ वाटतात. याचे कारण त्यांचा स्वयंसिद्ध आशय व अभिव्यक्ती ही स्वयंसिद्ध असतात हेच होय. तुकारामांच्या प्रतिमा सृष्टीचे आणखीं एक सत्य आहे. या सत्याचा निर्देश बऱ्याच स्पष्टपणे प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी आपल्या एका लेखात केलेला आहे :— ('वाङमयीन टीपा व टिपणी' मधील "तुकारामाची कविता काही विचार") "तुकारामांचे ग्राम्य परंतु अत्यंत समर्पक दृष्टांत जसे त्यांच्या अभंगांची गोडी फारशी कमी करू शकत नाहीत, त्याचप्रमाणे त्यांच्या अभंगात परत परत तेच दृष्टांत आले, तरी त्याची परिणामकारकता कमी होत नाही. याचे कारण एकच व ते म्हणजे तुकारामाच्या व्यक्तिमत्वाचे आपल्या मनावर पडत असलेले जबरदस्त आकर्षण."

विरोधाची अभिज्ञता व त्याचा नेमका रेखीव आविष्कार ह्या गोष्टी मूलत: बौद्धिक आहेत.

(पृष्ठ १२५ वर पहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भा. त्र्यं. परांजपे / श्रीकृष्णाची गीता किती ?

"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे" या सुरुवातीच्या शब्दापासून तो "नीतिर्मतिर्मम" या शेवटल्या शब्दासह श्रीकृष्णार्जुनसंवादाची ७०० श्लोकांची श्रीमद्भगवद्गीता, अनेकांच्या नित्यवाचनात तोंडपाठ म्हणण्यात आहे. त्याकरिता ४० ते ६० मिनिटे लागतात. अशा १० व्यक्तींना लागणाऱ्या वेळाची मी सरासरी काढली आहे. पाठ म्हणण्यापेक्षा वाचण्याला जास्त वेळ लागतो. त्यावरून हे सिद्ध होऊ शकते की ७०० लोकांच्या गीतेला मुळातल्या प्रश्नोत्तर पद्धतीच्या गीतेला यापेक्षा कितीतरी अधिक वेळ लागला असला पाहिजे. प्रश्न करणाराला मनात प्रश्न तयार करायला वेळ लागणारच. उत्तर देणाराला विचार करून उत्तर द्यायला त्यापेक्षा साहजिकच अधिक वेळ लागेल. यांवरून गीता पूर्ण व्हायला दीडतास तरी खासच लागला असला पाहिजे.

ख्रिस्ती शतकापूर्वी ३१०१ या वर्षाच्या मार्ग. शु. १३ या दिवशी, सूर्योदयी (भारताचार्य चिंतामणराव वैद्य) कौरवांची ११ अक्षौहिणी सेना (२१८७० रथ + २१८७० गज + ६५६१० अश्व + १०९३५० पादाती × ११ = जो आकडा येईल तो) आणि पांडवांची त्याच घटक प्रमाणातली ७ अक्षौहिणी सेना, समोरासमोर युद्धाकरिता उभी ठाकली होती. त्याशिवाय छोटे मोठे सेनापती होतेच. आधुनिक भाषेत ही लढणारी फौज (Army) होती. तिच्या पाठीमागे 'अनुकर्ष', 'तुणीर', 'वरूथ', 'तोमर', 'उपासंग', 'ऋष्टी' इत्यादींची जबाबदारी असलेले, आजच्या भाषेतले (Services) चे असंख्य सैनिक होते. इत्यर्थ हा की, सेना प्रचंड होत्या, आणि केव्हाही बाण सुटण्याचा पहिला प्रहार होण्याचा क्षण आलेला होता.

महाभारतात एके ठिकाणी असे सांगितले आहे की, आधी हे युद्ध करण्याचे उभयपक्षांना मान्य असे, नियम ठरले होते. त्यात 'ओली सुकी' सारखे असेल कदाचित ! युद्ध सुरु करण्याचा मान पांडवांनी उदार मनाने कौरवांना दिला होता. भीष्म कौरवांचे सरसेनापती होते. तेव्हा ते पहिला प्रहार करणार होते——तशी आपल्या सैन्याला आज्ञा अनुमती देणार होते. आता ते आपला हा अधिकार बजावणार ! इतक्यात——

कृष्णाने अर्जुनाचा रथ 'सेनयोर्उभयोर्मध्ये' आणून उभा केला. अर्जुनाने चौफेर नजर टाकली. आपले गांडीव टाकून दिले, रथातून खाली उतरला. सारथ्यासम्मुख उभा राहिला आणि गीता सुरू झाली. उभय सेना हा विचित्र प्रकार पहातच उभ्या राहिल्या! शेवटी एकदाची दीडएक तासानंतर गीता संपली; आणि अर्जुन परत आपल्या जागी गेला. न. र. फाटक महाभारताच्या भाषांतराच्या 'भीष्मपर्व परिचया'त सांगतात, "भगवद्गीता आटोपली तरी, युद्ध सुरू झाले नाही." परंतु किती वेळाने सुरू झाले, हे कोणीही सांगत नाही.

इतका वेळ कौरव सैन्य कठोर संयमाने, समोर चाललेला हा प्रकार पाहात उभे होते असे दिसते. सरसावलेली खड्गे आकर्ण ओढून धरलेल्या प्रत्यंचा, किती वेळ त्याच तशाच स्थितीत राहू शकतील ? त्या काळातली युद्धे म्हणजे आजच्या हॉकी, फुटबॉलच्या मॅचेस होत्या काय ? की पंचाने शिट्टी फुंकताच सुरू ! या युद्धात पहिल्या दिवशी हे शिट्टी फुंकण्याचे काम भीष्माने केले. दुसऱ्या दिवशीही कौरवांनीच लढाई सुरू केली, असे महाभारत सांगते. तो काळ धर्मयुद्धाचा काळ होता. परंतु या युद्धात ते नियम पाळले गेले नाहीत. तिसऱ्या दिवसाच्या युद्धाच्या सायंकाळी, भीष्मानी पांडव सेनेत जेव्हा भयंकर हाहाकार उडवून दिला, तेव्हा 'न धरी शस्त्र करी मी' ही प्रतिज्ञा केलेला कृष्ण, आपले सुदर्शन चक्र सरसावून भीष्मावर धावून गेला. तेव्हा त्याला अर्जुनाने आवरले. नंतर त्याच कृष्णाने कर्णाला 'अरे,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राधासुता ! तेव्हा तुझा धर्म कोठे गेला होता ?' असा टोमणा हाणला. कृष्णाने हातात जरी घोड्यांचे लगाम घेतले होते, तरी तो आपले सुदर्शन चक्र घरी ठेवून आला नव्हता. त्याला "अनायुधास आसतां सयंताम्" ही ऋग्वेद-वाणी माहीत होती. त्यातूनही तो क्षत्रिय होता. हे सर्व येथे सांगण्याचे कारण, लोकमान्य गीतारहस्यात (आवृत्ती १ ली, पान ४४२) सांगतात, "एका सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य क्षत्रियाने, दुसऱ्या महान धनुर्धरास क्षात्र धर्माच्या स्वकार्यास प्रवृत्त करण्यासाठी गीता उपदेशिली आहे, हे वाचकाने प्रथम लक्षात ठेवले पाहिजे."

८२६ व्या पानावर लोकमान्य म्हणतात, "स्वधर्मप्रमाणे प्राप्त झालेले युद्ध सोडून देऊन, भीक मागण्यास तयार झालेल्या अर्जुनास आपले कर्तव्य करावयास प्रवृत्त करण्यासाठी, गीता उपदेशिलेली आहे; हे पहिल्या अध्यायावरून स्पष्ट आहे." याविषयी दुमत नाही, ही आनंदाची गोष्ट आहे. १८ व्या अध्यायाच्या ५९ व्या श्लोकात "यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे । मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति" मी लढणार नाही असे जे तू अहंकाराने म्हणतो आहेस, तो तुझा निश्चय फुकट ! प्रकृती म्हणजे तुझा स्वभाव, तुला ते करावयास लावील. असे कृष्णाने अर्जुनास निक्षून सांगितले आहे ते अतिशय महत्वाचे आणि लक्षणीय आहे. अर्जुन क्षत्रिय होता. युद्ध हा त्याचा स्वभावधर्म होता आणि कर्तव्यही होते त्याची कृष्णाने त्याला शेवटी आठवण दिली, आणि लगेच ६६ व्या श्लोकात "सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वां सर्व-पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।" अरे भितोस कशाला ? मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन ! या आश्वासनाने अर्जुनाचे पूर्ण समाधान झाले, आणि त्याने कृष्णाला "करिष्ये वचनं तव" असे वचन दिले. (कृष्णाने अगदी सुरुवातीलाच अर्जुनाला 'क्लीव' ही शिवी दिली होती.) आणि युद्ध केले. तेथेच गीता संपली. त्या अध्यायातले बाकीचे ६ श्लोक ही कृष्णवाणी नाही. तसेच, गीतेच्या एकंदर ७०० श्लोकांपैकी सुमारे ६६० तरी, श्लोकही कृष्णाने सांगितलेले नाहीत, असे म्हणावयास भरपूर जागा आहे.

कृष्णाला अर्जुनास आणखीही काही दुसरे ब्रम्हज्ञान सांगावयाचे असते, तर गीता तेथे संपली नसती. कारण ज्ञानाला 'इति' नाही. दुसरी गोष्ट कृष्ण जेव्हा अर्जुनाला सर्व (इतर) धर्म सोडून मला शरण ये, असे सांगतो, तेव्हा 'धर्म' या शब्दाचा रोख आणि अर्थ क्षात्रधर्म, युद्धधर्म हाच आहे. 'मोक्ष धर्म' किंवा इतर पसारा हा नाही. धर्म याचा अर्थ कर्तव्य, हाच आहे. ईश्वरप्राप्तीचा किंवा मोक्षाचा मार्ग हा नव्हे. त्या प्रसंगी इतर दुसरा कोणताही अर्थ, श्रीकृष्णाला अभिप्रेत असणे शक्यच नाही. कृष्ण अर्जुनाला आपल्याला शरण ये, असे जेव्हां सांगतो, तेव्हा माझ्यावर विश्वास ठेव हाच त्याचा अर्थ आहे. अर्जुनाची मुख्य शंका होती, मी युद्ध करणे हे पाप तर नव्हे ? त्यावर कृष्णाने त्याला निःशंक केले. कृष्णाने आश्वासन दिले, "हे पाप मुळीच नाही. इतक्या उप्पर तुला तसे वाटत असले, तर तुला सर्व पापांपासून मी मुक्त करीन". अर्जुनाचा कृष्णावर जितका विश्वास होता, तितका जगात कोणावरही नव्हता. तेव्हा प्रश्नच उरला नाही. "नष्टो मोहः" माझा मोह, काय करू ? कसे करू? हे सर्व संपले. माझी आठवण मी क्षत्रिय असल्याची, आणि युद्ध हाच माझा धर्म-कर्तव्य असल्याची, माझी विसरलेली आठवण, मला परत मिळाली आहे; आता तू सांगतो आहेस ते युद्ध मी करीन. आता कृष्णाला सांगायला काही उरले नव्हते.

परंतु हे सांगायला कृष्णाला आणि पटायला अर्जुनाला ७०० श्लोक लागले नाहीत. अर्जुन इतका मठ्ठ नव्हता, आणि अप्रासंगिक, असंबद्ध बडबड करायला, कृष्ण गोष्टीवेल्हाळही नव्हता. आणि इतका वाचाळपणा करण्याचा तो प्रसंगही नव्हता. समोर ११ अक्षौहिणी योद्धे शस्त्रे सरसलून, धनुष्यांना लावलेल्या बाणांसह प्रत्यंचा ताणून तयार उभे होते. कृष्णाने त्यांना 'Time please' म्हणून वेळ मागून घेतलेला नव्हता. ! तेव्हा कृष्णाने जी गीता सांगितली आणि अर्जुनाला जी पटली, तिला पाच मिनिटांपेक्षा अधिक वेळ खासच लागला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नसला पाहिजे ! अध्याय १, २, ३, ४, ८, १०, ११ आणि १८ यांतील सर्व मिळून जास्तीत जास्ती ६०।६५ श्लोकांपेक्षा अधिक गीता, श्रीकृष्णाची त्याने सांगितलेली नाही. अर्जुनाने ७३ व्या श्लोकात 'करिष्ये वचनं तव' असे वचन दिले, त्याच्या आधीचे दोन श्लोक ७१ आणि ७२ असे आहेत. "श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः। सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ।।" आमच्या दोघांच्या धर्मसंवादाचे जो कोणी अध्ययन करील, त्याने ज्ञानयज्ञाने माझी पूजा केल्यासारखे होईल, असे मी समजेन (७१)— "कच्चिदेत च्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा। कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय" ।। दोष न काढता, श्रद्धेने जो जो कोणी हे ऐकेल, तोही पापापासून मुक्त होऊन, पुण्यवान लोकांना प्राप्त होणाऱ्या शुभ लोकांप्रत जाऊन पोहोचेल. (७२) हे कृष्णाने त्यावेळी स्वमुखाने अर्जुनास सांगितले याच्यावर माझा तरी विश्वास बसत नाही.

दुसरीही एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. त्या काळात संभाषणे, प्रश्नोत्तरे छंदोबद्ध श्लोकात होत असत, असा कोणताही पुरावा नाही. ही सर्व श्लोकबद्ध रचना नंतरची आहे हे निःसंशय.

आणखीही एक गोष्ट. अर्जुनाचे काही प्रश्न व शंकाकुशंका जसा असंबद्ध आहेत, तशी कृष्णाची उत्तरेही आहेत. कित्येक वेळी, कृष्णाने सरळ उत्तर देण्याचे टाळून दुसराच पाल्हाळ लावलेला आहे. विश्वरूप दर्शन अद्भुतच आहे. हा चमत्कार युद्धभूमीवर घडतो आहे ! श्रद्धा, भक्ती व भावना थोड्याशा आवरून गीता वाचली, तर अर्जुनाला लढायला उभे करायला लागलेली गीताच फक्त कृष्णाची आहे हे पटायला हरकत असू नये !

शेवटले प्रमाण. 'जय' महाभारताचे मूळ आहे असे सांगितले जाते. हे युद्ध झाल्यानंतरच 'जय' नावाचा छोटा ग्रंथ लिहिला गेला. परंतु त्याकरिता युद्ध व्हावे लागले. कृष्णाने अर्जुनाला सांगितलेल्या गीतेमुळेच युद्ध झाले. अर्जुनाला काही पटलेच नसते, तर युद्ध झाले नसते; आणि मग 'जय' आणि त्याचे 'महाभारत' कोठून होणार ?

भारताचार्य चिंतामणराव वैद्यांनी महाभारताच्या उपसंहारात असे सांगितले आहे की " 'जय' हा छोटा इतिहासग्रंथ व्यासांनी लिहिला. महाभारताच्या आदिपर्वात 'जयोनामेतिहासोऽयम्' या इतिहासाचे नाव 'जय' हे आहे असे सांगितले आहे. हाच ग्रंथ 'भारत' हे नाव पावला. तो विस्तृत झाल्यावर 'महाभारत' झाला". भारत 'हा' वैशंपायनांचा ग्रंथ होता आणि सौतीने त्याचा महाभारत 'हा' प्रचंड ग्रंथ बनवला. आता श्रीकृष्णाने सांगितलेली गीता 'या' तिघांनीही ऐकलेली नाही. परंतु ती तीन्ही ग्रंथांत असलीच पाहिजे. महाभारतात आहे. तेव्हा गीतेला तिघां पंडितांचे स्पर्श झालेले आहेत हे निःसंशय. त्यांनी आपआपले ग्रंथ एकापेक्षा एक मोठे केलेले आहेत. तर त्यात एक गीताही मोठी केलेली असलीच पाहिजे !

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुरेश गउरकर / तणावा

'तणावा' हा राजा मुकुंदांचा पहिलाच कविता-संग्रह हा संग्रह तपासून बघताना 'फुल-वण्याच्या भावुक गर्दीत फुलायचेच राहून गेलेल्या कवीच्या' उध्वस्त जीवनजाणिवांचे सादपडसाद आपल्याला गवसतात.

या कवितेत कवी प्रामाणिकपणे आपल्या ओसाड उजाड जीवनाशी एकरूप होऊन काव्य फुलवण्याचे ध्यास जपताना दिसतो. त्यात परि-स्थितीच्या काटयांनी ओरखाडल्या जाणाऱ्या निर्मितिक्षम हातांना झालेल्या जखमांच्या वेदना सर्वत्र काव्यभर विकल आवसयात्रा भरवून राहतात. त्यामुळेच की काय या कवितेच्या फुलण्याउमल-ण्यात उध्वस्तताच कायमची प्रत्ययास येत राहते.

ही उध्वस्तता या काव्याचा जिवंत काव्या-नुभव आहे. तिचा शोध आपल्याला कवीच्या मनस्थितीत घेऊन सापडणारा नाही किंवा लागणारा नाही, तर कवीभोवतीच्या विराण, उध्वस्त जीवनात ही उध्वस्तता शोधावी लागते.

मात्र यासाठी कवितेच्या बाहेर कवीच्या नित्याच्या जीवनात डोकावण्याची मुळीच गरज नाही, तर या संग्रहातील कवितांतूनच ही उध्वस्तता कायमची प्रत्ययाला येत राहते. जीवनात एक अपेशीपण, दरवेशीपण वाट्याला आल्याची ग्वाही ही कविताच देते आहे. मात्र हा अपेशीपणाचा सूर कवीच्या मनातून उगवलेला नाही तर कवि-जीवनाभोवती पिंगा घालणाऱ्या उध्वस्ततेच्या साद-प्रतिसादांचाच हा भाग आहे. कवीने मात्र त्याचे कारण दुसऱ्याला झाकण्यात गेलेल्या आयुष्याच्या अनुषंगाने शोधले आहे.

वाट्याला आलेली राख तेवढी पवित्र
नग्नता आहे तापून निघालेली वावनकशी
दुसऱ्याला झाकण्यातच जिंदगी कटाप झाली
म्हणणारे म्हणोत दरवेशी अपेशी...

वाट्याला आलेल्या उध्वस्ततेची राखच तेवढी पवित्र मानून या नग्नतेने तावून सुलाखून निघालेले दारिद्र्याचे वावनकशीपण कवीच्या त्यागातून येते. पण हा त्याग समाधानात परावर्तित झाला असला तरी वाट्याला उपेक्षाच आली. हीच व्यथा कायमची या कवितेत अनेकदा प्रगट होते. जसे कवीच एके ठिकाणी म्हणतात

माझं माझं म्हणून खप केलं सर्वस्व गमावून
पण मला फक्त काववाज अंधारच भेटला
ताणून ताणून तारा तुटल्या तंबोऱ्याच्या
हवा होता तो स्वर मला नाहीच मिळाला...

माझं माझं म्हणून सर्वस्व गमावण्याच्या व्रतवेड्या इच्छेपोटी केवळ काववाज अंधारच कवीच्या पदरात आलाय. हवा तो कृतार्थतेचा, समाधानाचा सूर आळवताना जीवनात जो 'तणावा' निर्माण झाला तिथे कुठलाच हवा असलेला स्वर नीट लागला नाही तर तंबोऱ्याच्या ताराच तुटून गेल्या ही शोकांतिका.

तसे बघायला गेले तर या कवितेत सर्वत्र तप्त व विराण अशी दुपारच भरून वाहतेय. कुठे कुठे संध्याकाळही होते, नाही असे नाही. पण सायंकाळही उदासीनतेच्या कचाट्यात सापडली आहे.

'दुथडी भरून वाहणाऱ्या उन्हाचा उतार झाल्यावर काळीज कुरतडणारी सार्वभौम संध्या-काळ. ' पहाट, दुपार, संध्याकाळ या साऱ्याच उध्वस्ततेच्या व जखमीपणाच्या कचाट्यात सापडल्या आहेत. कधी हा 'कचाटा' 'रैना नैनात चुरली' असतानाही डंखाने भिनलेल्या वाटेवर उगाच भिर्र भिर्र करत उडणाऱ्या पाखराचा मागोवा घेत जातो.

कवितेची स्थिती कवीसारखीच आहे. काटे बोचले तरी ती गंध उधळते, वाट बारावाट होऊनही ती चालत राहते. कवीला जसे सुख मानवणारे नाही तसेच तिलाही चांदणे मानवत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अतृप्तीच्या फुफाट्यात सापडलेल्या कवीला मातीच्या जिवंतपणावर वाहता वाहता कवितेचं स्वयंभू प्रतिबिंब बघण्याची तीव्र इच्छा आहे. पण कवीच्या भोवती पसरली आहे ती उध्वस्तता.

अशा या उध्वस्ततेच्या प्रवासात (सहस्र रश्मीचं आयुष्य वाहून नेतानाच्या) मेळे, उत्सव खूप बघून झाले, ज्यात हृदयस्थ शिंपल्यांची ओंजळ शेवाळ होऊन ओघळत गेलीय आणि गात्रागात्रातून सारखे लक्षावधी क्षितिजांचे मनोरे ढासळत राहिले. या अशावेळी ढणढणते हुंदके अंधारवश झाल्यावर श्रद्धेच्या मुरव्वी चाहुलीचीही कवीला गरज वाटत नाही. कवी व्यथेच्या शोधात कोसळत्या वावधुळीत सापडूनही तिला शोधण्याचे आपले प्रयत्न थांबवीत नाही. तीच त्याची प्रेयसी, सखी, श्रद्धा आहे.

व्यथा ही जेव्हां उन्हाळी वणव्याचे विराट रूप धारण करते तेव्हा या उध्वस्ततेत आपले आणि तिचे अस्तित्व कवीला पुढीलप्रमाणे दिसते:—

भटकलेल्या हरवलेल्या पायवाटे सारखा 'कवी'
अन मृगजळानं पेटलेल्या बेटावर
कापरा सारखी ओणवी होऊन पाण्याच्या बोटांनी
छाती वडवणारी वणव्यात सापडलेली 'कविता'—

आपल्या आणि कवितेच्या अस्तित्वाला असे बघणेच कवीला आवडते. म्हणूनच ती कधी 'झुलत्या चंद्रवनात' रमू लागली तर कवी तिला खोचकपणे विचारतोय—

खडकाच्या सांदोरीत सूर्याची पाचर
केव्हाच ठोकलीय मी. .
एव्हाना तू उठायला हवी होतीस
शरदातल्या चांदणी चुन्यात मश्गुल का झालीस
आवडतोय का त्याचा पोत ?

आपले व कवितेचे अस्तित्व समरूप बघणाऱ्या कवीला तिचे चांदण्याच्या चुन्यात मश्गुल होणे कसे आवडणार ?

कवीला 'दुपारी'चे प्रेम आहे तसे 'दुपारी'चे भानही आहे. या 'दुपारी' ची सोय झाली अन भुकेल्यांची पोटे टच्च भरलेली पाहली तर टाळवीणा (कविता) विकल्याचंही कवीला काहीच वाटत नाही. कारण यात्रेतले अभंग ढेकरांच्या ताना ऐकतानाची तृप्ती देतच नाहीत.

प्रस्तावनेत प्रा. नरहर कुरुंदकरांनी म्हटल्या-प्रमाणे "एका अर्थी कोंडीत सापडलेल्या या मनासाठी सकाळ, दुपार आणि सायंकाळ या निरनिराळ्या बाबी नाहीत. ती न संपणाऱ्या सायंकाळीची वेगळी रूपे आहेत." यातच थोडासा बदल करून म्हणावेसे वाटते की, न संपणाऱ्या जीवघेण्या उध्वस्त दुपारीचीचं ती वेगवेगळी रूपे आहेत.

उध्वस्त जीवनाच्या साद-पडसादांनी भरलेले भयाणभोर दुपारीसारखे काव्यविश्व कवीने जिवंतपणे उभे केले आहे ते स्वनिर्मित समर्थ प्रतिमांवर. याच सर्व प्रतिमांत साध्या प्रतिमां-पेक्षा संमिश्र, विरोधी व संश्लिष्ट प्रतिमाच अधिक आढळतात. आणि त्या संवेदनांना जिवंत करीत योग्य आशयाची भर्ती योग्य जागी कवितेत चपखलपणे बसून वाढवितात, यात शंका नाही.

पण या प्रतिमांतूनही बहुतांशी उध्वस्तताच ओसंडत राहते आणि तो त्यांचा दोष नव्हे तर गुणच आहे, हे पुढील प्रतिमांच्या उदाहरणांनी कळेल.

भयाणभोर आवस, फिक्या फिक्या उरावरील देठपिके स्वर, साकळलेली रक्तफुलांची जरतारी फडफड, डोळ्यातील वाळवंट कोरणारे चंद्र, शिल्प-मुग्ध प्रतिक्षेचे कण्हणारे पार्थिव टणत्कार, वैशाखी वणवा, गुलवक्षी पाकळ्यांची अथांग ग्लानी, रंध्रगर्द आर्तता, स्वप्नांची पानगळ, उत्सुक नग्नता, नग्न शरीराशी खेळणारा धर्म, तेलकट स्वप्न, काळीज कुरतडणारी सार्वभौम सायंकाळ, फोंड्या माळ, जडशीळ हिवाळा, मुजोर खाडी, पिवळ्या धम्मक पायवाटा, दचकते मोरवन, मंजिरी व्यथा, डंखभिनली वाट, उन्हाच्या लाटा, मृगजळाचे असंख्य काफिले, बावन्नकशी नग्नता, कांचनदर्दी मळे, दशांगुळे उरलेली कासाविशी, इंद्रियशून्य बागेश्री, विव्हळणारे लव्हाळे, विषवल्ली झरे, वखवखलेली हाडे.

अशा एक ना अनेक प्रकारच्या प्रतिमांतून कवीची कविता फुलत राहते. ही कविता, फुलण्याच्या भावुक गर्दीत फुलायचेच विसरून गेलेल्या कवीची जेवढी आहे तेवढीच त्याच्या वाटचाला आलेल्या उध्वस्ततेची व त्या उध्वस्ततेने कविजीवनात निर्माण केलेल्या साद-पडसादांचीही, आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

'ओंकारेश्वर', 'खजुराहो' (१), 'खजुराहो परिसर', 'जान्हवीचे त्रिदळ', 'लक्ष्मणघळी' यासारख्या स्थळांशी कविप्रकृतीचे नाते जोडणाऱ्या कविता जशा या संग्रहात आहेत तशा 'माद्री', 'उर्मिला' सारख्या चिंतनशीलतेची पातळी लाभलेल्या वेगळ्या धर्तीच्या कविताही या संग्रहात आहेत. परंतु 'तगमग', 'तुझी लागता चाहुल' यासारख्या कवितांची 'चाहूल' आगामी संग्रहातच घ्यावी लागणार आहे.

राजा मुकुंदांच्या काव्यविश्वात एकच एक उध्वस्ततेचा सूर कायमचा वाहतो आहे. त्यामुळे कवितेला एकसुरीपणा आलेला आहे असे म्हणून या कवितेचे महत्त्व कमी होणार नाही. स्वतःच्या पिंड-प्रकृतीशी आणि परिस्थितीशी एकाच वेळी इमान राखल्यावर जशी कविता निर्माण झाली असती तशीच ही कविता आहे. तिच्यातील एकसुरीपणाच्या दोषासकटही ती स्वीकारावीच लागेल असे म्हणावेसे वाटते.

तणावा—राजा मुकुंद, नांदेड;
प्रकाशक वामन विष्णु भट;
अभिनव प्रकाशन, दादर, मुंबई-१४;
किंमत ५ रुपये.

⊕ ⊕ ⊕

(पृष्ठ २१९ वरून)

आणि म्हणूनच तुकारामांच्या विवेकवृत्तीला विरोधात्मक प्रतिमा या अधिक मानवल्या. आशयाचा व अभिव्यक्तीचा एक निश्चित विवेक या प्रतिमांतून पारदर्शक होतो. ज्या वाचकाला ही परिभाषा अज्ञात असते त्याला ती प्रतिके समजत नाहीत. त्रिविध तापांनी त्रस्त होणाऱ्या सांसारिकांचे, त्यांच्या अगतिकतेचे क्षुद्र बुद्धिवादाचे, मृत्यूच्या अपरिहार्यतेच्या अज्ञानाचे आणि त्याच्या परिसरात वावरणाऱ्या त्याच्या असहाय्यतेचे प्रतिकरूपाने केलेले वर्णन त्यांच्या काव्यात आहे. त्यांच्या प्रतिमासृष्टीला त्यांच्या सांप्रदायिक निष्ठेने दिलेली ही प्रतिमांची देणगी लक्षणीय आहे.

तुकारामांची अभंगवाणी म्हणजे त्यांचे आध्यात्मिक आत्मचरित्र होय. तुकारामांच्या कवित्वाचा परमोत्कर्ष बघावयाचा असेल तर ज्या अभंगात श्रेष्ठतम अध्यात्मानुभवांचे दर्शन आपल्याला घडते ते अभंग बघावेत. आशय आणि अभिव्यक्ती यांचा इतका गोड मिलाफ आढळून येतो की, ते सारे अनुभवविश्व नजरेसमोर मूर्तिमंत तरळू लागते. "हरिनाम वेली पावली विस्तार, फळी पुष्पी भार वोल्हावली। तेथे माझ्या मना होई पक्षीराज साधावया काज तृप्तीचे वा". तुकोबांचे अभंग मराठी भाषेचे लोकधन व चैतन्यध्यान ठरले म्हणूनच त्यांची वाणी महाराष्ट्र-वेद ठरली. 'अमृताची वाणी वरुषला शुद्ध' हा समकालीन रामेश्वर भट्टांचा तुकोबांच्या कवित्वाविषयीचा अभिप्राय तीन शतकांनंतरही सार्थ ठरला!

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिलीप देशपांडे / **गाभारा**

कै. वि. स. खांडेकर म्हणजे आधुनिक मराठी वाङमयाचे विविधतापूर्ण दालन समृद्ध करणारे एक ख्यातनाम साहित्य महर्षीच होते. मराठीतील महत्त्व-पूर्ण असे अनेक साहित्यप्रकार खांडेकरांनी अत्यंत सफाईदारपणे हाताळलेले आहेत. त्यांच्या समग्र वाङमयाचे- यथार्थ दर्शन वाचकांना घडावे असा प्रयत्न फार थोडया लोकांनी केला आहे. कारण अशी पुस्तके अभ्यासकांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आणि उपयुक्त ठरतात. प्रा. मा. का. देशपांडे व डॉ. एस. एस. भोसले यांनी अशा प्रकारचा प्रयत्न आधी केलेला आहे. एखाद्या प्रथितयश ग्रंथकाराच्या वाङमयाचे सर्वांगीण समालोचन करणारा ग्रंथ हा त्या साहित्यिकाचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी उपयोगी ठरतो. याच दृष्टीने 'गाभारा' चे महत्त्व आहे. यात खांडेकरांच्या वाङमयाचे समालोचन आहे. अगदी सुरवातीलाच संपादकद्वयांनी स्पष्टच लिहिले आहे, "कै. वि. स. खांडेकर यांनी मराठी साहित्याची जी महनीय सेवा केली तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्या-साठी हा लेखसंग्रह तयार करण्यात आलेला असून कै. भाऊसाहेबांनी केलेल्या वाङमयीन कामगिरीचे सुजाणपणे पण सहृदयतेने परिशीलन व्हावे ही या संग्रहातील सर्व अभ्यासकांची भूमिका आहे."

आज खांडेकर हयात नाहीत पण त्यांचे वाङमय मात्र अजरामर आहे. भाऊसाहेब हे दिवंगत झाल्यामुळे त्यांच्या वाङमयात आणखी भर पडणे शक्य नाही. खांडेकरांना साहित्यसृष्टीतील सर्वप्रकारचे मानसन्मान मिळाले आहेत. इ. स. १९७५ मध्ये त्यांच्या 'ययाती' या गाजलेल्या कादंबरीला 'भारतीय ज्ञानपीठा'चा पुरस्कार मिळाला. तसेच भारत सरकारकडून 'पद्मभूषण' ही पदवी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला होता. अशावेळी अशा थोर साहित्यिकाच्या वाङमयाचे समालोचन व्हावे या उद्देशाने 'गाभारा' हे पुस्तक प्रसिद्ध करून संपादकद्वयांनी मोठे औचित्य साधले आहे. खांडेकरांनी विविध वाङमयनिर्मिती करणाऱ्या वाङमयाच्या सर्वच क्षेत्रांत संचार केलेला असल्यामुळे 'गाभारा' मध्ये एकाच लेखकाचे दर्शन नसून अनेक विद्वान लेखकांचे दर्शन घडते, असे म्हणावेसे वाटते.

'गाभारा'चे शिल्प हे अनेक मान्यवर शिल्प-कारांनी उभारलेले आहे. यामधून खांडेकरांच्या वाङमयाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. अभ्यासाच्या दृष्टीतून या ग्रंथाचे चार विभाग पाडता येतील :—

(अ) खांडेकरांच्या कादंबरीवरील समालोचनात्मक लेख,
(आ) खांडेकरांच्या कथेवरील समालोचनात्मक लेख,
(इ) खांडेकरांच्या समीक्षेवरील समालोचनात्मक लेख,
(ई) खांडेकरविषयक इतर समालोचनात्मक लेख.

पहिल्या विभागात खांडेकरांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचे स्वरूप कोणते, त्यामागील प्रेरणा कोणती, त्यांच्या कादंबऱ्यांमधून येणाऱ्या स्त्री-जीवनाच्या प्रतिमा कशा आढळतात, त्यांच्या कादंबऱ्यांमधील प्रमुख पुरुष-व्यक्तिरेखा कोणत्या, 'ययाती'चे मूल्यमापन इत्यादी विषयांवरील लेख आहेत तर दुसऱ्या विभागात खांडेकरांचे कथालेखन, रूपककथा व चित्रपट कथा यांविषयीचे महत्त्वाचे लेख आहेत. तिसऱ्या विभागात त्यांची काव्य-समीक्षा, नाटयसमीक्षा, कथासमीक्षा आणि पाश्चात्त्य गवाक्षातून दिसणारी खांडेकरी समीक्षा इत्यादी लेखांचा अंतर्भाव आहे. लघुनिबंधकार खांडेकर, खांडेकरांच्या वाङमयातील उपेक्षितांचे जीवनचित्रण, खांडेकरांच्या वाङमयीन आणि जीवनविषयक भूमिका, संगीत 'रंकाचे राज्य,' 'ज्योत्स्ने'चे संपादक वि. स. खांडेकर, खांडेकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

आणि मराठी रंगभूमी आणि खांडेकरांचे वक्तृत्व हे महत्वपूर्ण लेख चौथ्या विभागात येतात.

'गाभारा' तील सर्वच लिखाण हे अभ्यासपूर्ण आहे, यात शंका नाही. समीक्षण म्हणजे केवळ एकतर्फी स्तुती नव्हे. समीक्षण करीत असताना भाऊसाहेबांच्या वाङमयाचे यथार्थ दर्शन व्हावे या भूमिकेतून त्यांच्या गुणगौरवाबरोबरच परखड दोषदिग्दर्शनसुद्धा केलेले आहे. खांडेकरांचे खरे कर्तृत्व कादंबरी, कथा व समीक्षा या वाङमय-प्रकारांमध्येच आढळून येते. कलेची जी खरी मूल्ये आहेत त्यांच्या निकषांवरच खांडेकरांच्या समग्र वाङमयाचे न्याय्य समालोचन झाले पाहिजे. सामाजिक ध्येयवाद असूनही कलात्मकता राहू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या. कलात्मकता आणि सामाजिकता यांचा योग्य मेळ खांडेकरांच्या वाङमयात झालेला आहे. श्रेष्ठ कलावंत हा केवळ कलावंतच नसतो तर तो समाज द्रष्टा व अप्रत्यक्षपणे समाजाचा शिक्षकही असतो. अशा उच्च कोटीतील कलावंतांच्या रांगेत खांडेकरांना मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

या लेखसंग्रहाला दिलेले 'गाभारा' हे शीर्षक अत्यंत समर्पक असून मुखपृष्ठ कलात्मक आहे. ग्रंथाच्या शेवटी खांडेकरांच्या लिखित वाङमयाच्या सूचीबरोबरच खांडेकरविषयक वाङमयाची सूची-देखील दिलेली आहे त्यामुळे अभ्यासकांची उत्तम सोय झाली आहे. अशा या साक्षेपी ग्रंथाबद्दल संपादकांना धन्यवाद द्यायला हवेत.

गाभारा, संपादक डॉ. मु. श्री. कानडे,
प्रा. भालचंद्र खांडेकर,
अनमोल प्रकाशन,
पुणे–२; १९७८.
पृष्ठ संख्या २७९.
मूल्य २५ रुपये.

⊕ ⊗ ⊗

विदर्भ साहित्य संघ

तीन भाषणे

गणेश व्याख्यानमाला–१९७७

व्याख्याते—डॉ. र. श. केळकर

- **१. साहित्य आणि अध्यात्म**
- **२. आशियात रामायण–परंपरा**
- **३. कृष्ण, विष्णु व मराठी आणि हिन्दीचे कृष्ण–काव्य**

卐

कि. रु. ४/–, सभासदांकरिता सध्या रु. ३/–

पुस्तक विक्रेत्यांना भरपूर सवलत दिली जाईल.

चौकशी–वि. सा. संघ प्रकाशन, झाशी राणी चौक, नागपूर–१२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीनिवास रामचंद्र सिरास / मी तुळस तुझ्या अंगणी

डॉ. सौ. आशा सावदेकर यांची ही पहिलीच कादंबरी असली तरी या कलाकृतीच्या द्वारे त्यांनी स्वतःच्या विशिष्ट लेखनशैलीची ग्वाही दिली आहे. खास स्त्रीच्या दुःखांना स्त्रीच अधिक सहजपणे वाचा फोडू शकते हे खरे आहे. या कादंबरीची नायिका आहे एक दुर्दैवी स्त्री, गंगा. ही गंगा सगळ्या आयुष्यातच लहान सहान सुखांपासून झिडकारली जाते. गंगाचे गणेशशी लग्न होते. तिला गणेशपासून मुलगाही होतो. पण गणेश कधीच तिच्यावर प्रेम करीत नाही. कारण गंगा सावळी असते. गणेशला हवी असलेली गोरी बायको स्वतःच गंगा आणून देते. हीच दुर्गी. प्रथम गंगाबद्दल मनात अढी बाळगणारी पण लवकरच गंगाचे मोठेपण सहज ओळखणारी. पण दुर्गीसुद्धा दीर्घायुष्यी ठरत नाही. ती मरताना गणेशला सारे विसरायची विनंती करते. पण त्यामुळे गणेश उलट चेकाळतो. हा चिडलेला गणेश गंगावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. स्वतःच्याच बायकोला तो आजपावेतो 'ताई' म्हणून छळत असतो. आता असाही छळून पाहातो. पण गंगाचे विशाल मन त्याला परत क्षमा करते व गणेशला तिसरी बायको आणून देते. ही लीला. लीला पांगळी असली तरी ती चांगलीच भांडखोर असते. पण शेवटी गंगाच्या विशाल मनाची तिलाही ओळख पटते. मरताना तीही गंगाला आपल्या चुका पोटात घालायची विनंती करते.

मग गंगाच्या मनात विचार येतो, 'दोघीही गेल्या भरल्या कपाळानं! त्यांच्या कुंकवाला अर्थ होता... तो माझ्याही कुंकवाला आहे? मला कुंकू कोण लावेल असं? अग, असे जायचेच होतं तर का आढचात? मला असं गुंत्यात पार गुंतवून टाकायला?'

गंगा ही नायिका दुःखी आहे, तिच्या दुःखाचे कारण सामान्य नाही. ते दुःख मानसिकही नाही किंवा भौतिकही नाही. गंगाला सुखे सगळी मिळाली पण त्याच बरोबर जीवाच्या जीवलगाने 'ताई' म्हणावे असेही दुःख लाभले. स्वतःचा मुलगा जितका तिला प्रिय तितकेच तिने सवतींच्याही मुला-मुलींवर प्रेम केले. कारण त्या मुलांना ती 'गणेश'ची मुले मानत होती. शिवाय त्या मुलांना जन्मापासूनचा गंगाचा जो लळा लागला तो कायम टिकणारा ठरला. अशाही परिस्थितीत गंगाला दुःख होतेच. कायमपणे टिकणारे पण त्याचबरोबर न संपणारे समाधान देणारे हे दुःख आहे. गंगाचे दुःख हेच की तिची जागा घराबाहेर अंगणात ठरली. मात्र त्याच बरोबर तिला अमर्याद समाधान मिळाले ते याचमुळे की ही घराबाहेरची जागा दुरून घराचं सुख बघणाऱ्या तुळशीची होती. गंगा सावळी तर खरीच पण गणेश सारख्यालाही तिचे प्रेम नाकारता आले नव्हते.

न रुजणारी काळी तुळस गंगानेच त्या घरात जगवली, फुलवली व वाढवली. पण त्याकरिता तिला आपल्या आयुष्याचे सर्वस्व द्यावे लागले. आपला सर्व जन्मच तिने नवऱ्याच्या पूजेवर वाहिला. आज कालच्या 'नव्या स्त्री' च्या कल्पनेत कदाचित हे स्वप्नमय मनोराज्यच ठरेल! पण एक खरे, स्वयंभू व प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून गंगा कायमची लक्षात राहील. डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी ही सुंदर आणि परिणामकारक कादंबरी लिहून वाचकांच्या अपेक्षा चांगल्याच उंचावल्या आहेत.

मी तुळस तुझ्या अंगणी :
डॉ. सौ. आशा सावदेकर,
सुनील प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर ४४००१२.
पृ. ९६; मूल्य ९ रुपये.

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंगल देसाई / अलेक्सांद्र पुश्किन : समीक्षेची समीक्षा

कुठल्याही समीक्षक, चिंतक, अध्ययनशील अशा कविमनाला जेव्हा कुठल्यातरी परदेशी भाषेतील एखादा संपन्न कवी, नाटककार—म्हणजेच लेखक आपल्याकडे अनाहूतपणानं, सहजगत्या आकर्षून घेतो तेव्हा 'ते परदेशी' आणि 'इथले देशी साहित्यप्रेमी मन' माणुसकीच्या जगात हिंडून फिरून भटकून अमर भावनेचे अतूट बंध आणि नाती कसं शोधत असतं याचा प्रत्यय 'अलेक्सांद्र पुश्किन' हे पुस्तक वाचताना आपल्याला येतो. शिवाजी विद्यापीठात झालेली व त्यानेच प्रकाशित केलेली डॉ. पंडित आवळीकरांची त्रिवेणी-सारखी गुंफलेली ही तीन व्याख्यानपुष्पं अशाच ह्या परदेशातल्या मानवी मनाचा शोध घेणाऱ्या देशी मनाचा परिचय घडवून देणारी आहेत.

अलेक्सांद्र पुश्किन (इ. स. १७९९ ते १८३७) हा 'जिस्तोकियवेक' अर्थात् 'निर्दयी' आणि 'रानटी' युगात जगणारा हळुवार मनाचा साहित्यिक आपल्याला एका विलक्षण अनुभवासारखा वाटतो. आपल्या मनावर तो व्याख्यात्याप्रमाणंच स्वतंत्र आणि सखोल असा ठसा उमटवून जातो. डॉ. आवळीकरांनी पुश्किनचा केवळ अभ्यास केला आहे असं मला हे पुस्तक वाचल्यानंतर वाटत नाही, उलट ते स्वत: 'पुश्किनमय' झाले आहेत याचं प्रत्यंतर वारंवार येत राहातं.

'अलेक्सांद्र पुश्किन' हे शीर्षक देऊन त्यांनी त्या लेखक-कवीचं रशियन नाव जसंच्या तसं ठेवून त्याला 'अलेक्झांडर' असं म्हणून आंग्लाळलं नाही हे विशेष.

समीक्षा करणं म्हणजे केवळ टीका करणं किंवा एखाद्या साहित्यिकाचा दोष दाखवणं असला तुटका तुसडा आणि निष्ठुर प्रयत्न ते 'समीक्षक' या नात्यानं करीत नाहीत ह्या त्यांचा आणखी एक विशेष; तर साहित्यिकाच्या कलानिर्मितीतील मर्मस्पर्शी कानेकोपरे पण धुंडून धुंडाळून त्याचा आस्वाद घेण्याचा व देण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच मन:पूर्वक असतो असं मला वाटतं.

यावरोवरच या व्याख्यानांची काही ठळक वैशिष्ट्यं दिसून येतात ती अशी :— पुश्किनच्या जीवनाचा व काही घटनांचा अभ्यास करून त्यातील बारकावे, धागेदोरे व्याख्यात्यांनी निवडून त्यांचा त्या संपन्न आणि प्रतिभावानं साहित्यिकाच्या निर्मितीशी संबंध जोडून त्या ज्वलंत आणि प्रतिभाशाली साहित्यनिर्मात्याच्या भावनेला न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे हे विसरता येणार नाही. म्हणूनच ही व्याख्यानं जीवनममीक्षेवर आधारलेली 'साहित्य समीक्षा' अशी आहेत.

पुश्किनच्या शाळकरी जीवनातले प्रसंग— 'त्सार'-च्या घरातील नाताशाचं चुंबन घेण्याचं किंवा 'झिझी'-च्या कमरपटयाचं माप स्वत:च्या कमरेवर मापून पहाण्याचं किंवा मार्याच्या सुंदर चरणांच्या स्पर्शा-साठी आसुसण्याचं वर्णन काव्यात्म असलेल्या ह्या भावनाशील साहित्यिकाच्या रसिक, रंगेल आणि प्रेमातुर मनाचा परिचय करून देणारं आहे. पुश्किनचं लग्न, लग्नजीवन व द्वंद्वोपरांत त्यांचा झालेला करुण अंत जीवनाच्या अनेकविध आणि बहुरंगी अशा अनुभवच्छटांतून त्याला स्फुरलेलं काव्य-नाटच अन् त्यातून दिसणारं गहिरं तत्वज्ञान जे 'उंच' असतं, 'भव्य' असतं— हे त्याच्या निर्मितीइतकचं काव्यमय आहे मानवी गुण-दोषांचं सुंदर दर्शन घडवणारं आहे. त्याच्या अखेरीच्या क्षणी त्यानं "अजून उंच करा! मला अजून उंच करा" असं म्हणणं हे सर्वच त्याच्या-सारख्या प्रतिभावंत कलावंताच्या पिंडाला साजेसं आणि शोभून दिसण्यासारखं आहे हे निस्संशयच.

सामान्य माणसाच्या मनात रहस्याचं जगातील अज्ञात अशा गोष्टी जाणून घेण्याचं एक विलक्षण कुतूहल असतं आणि ते कुतूहल मग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

काल्पनिक शोधानंही संतुष्ट होत असतं. तसंच - काहीसं काल्पनिक शोधानं आनंदित होणाऱ्या मनाचं दर्शन आपल्याला पुश्किनच्या कृतीत होतं. त्यांत आपल्याला पुश्किनचं कधी स्वातंत्र्यप्रेमी तडफदार मन दिसतं तर कधी प्रेमाचे वेडे चाळे करणारं, कधी सूडाच्या भावनेनं पेटलेलं तर कधी नाटयमय प्रसंगनिर्मिती करुन त्या 'नाटयांचा' आनंद लुटणारं !

नाटयात्मकता व त्या नाटयातील काव्यात्मकतेची प्रतीती आणून देणाऱ्या 'मत्स्यांगना' आणि 'संगमरवरी पाहुणा' या दोन कलाकृती विशेष पाहाण्यासारख्या आहेत. मत्स्यांगनेतील नायिका जेव्हा लपून लग्नगीतं गाणाऱ्या मुलींत मध्येमध्ये बोलते तिचा वेडा झालेला बाप राजकुमाराला पाहून जसे उद्‌गार काढतो किंवा संगमरवरी पुतळयाला आमंत्रण दिल्यावर तो पुतळा स्वतःच ऐनवेळी दोन जुआन आणि दोना अन्नाच्या भेटप्रसंगी तिथं येऊन ठेपतो हे आणि असे काही वेगळे प्रसंग पुश्किननं अगदी तन्मयतेनं व रसिकतेनं रंगवले आहेत. पुश्किनचा मिष्कीलपणा व नाटयप्रेम त्याच्या 'कुलीना–अकुलीना' या गोष्टीतूनही व्यक्त झाले आहे.

या व्याख्यानांवरून आवळीकरांच्या निरीक्षण-परीक्षणशक्तीचं आणखी एक वैशिष्टय दिसून येतं ते असं की, परदेशी भाषा-साहित्य व देशी भाषा-साहित्य यांचा तौलनिक अभ्यास करणारी त्यांची दृष्टी आहे. म्हणूनच त्यांना पुश्किनचा अभ्यास करताना कधी दस्तोयेव्स्की किंवा जुकोव्स्कीसारखे रशियन साहित्यिक आठवतात तर पुश्किनच्या भावना व विचारांशी समानांतर अशा आपल्या कवींच्या-कुसुमाग्रज, तांबे, गडकरी वगैरेंच्या ओळी किंवा संदर्भ त्यांना आठवू लागतात आणि काल, भाषा, व्यक्ती इत्यादींच्या बंधनांच्या पार गेलेल्या मानवीय भावानुबंधांचा प्रत्यय आपल्यालाही येतो. 'नेम' आणि 'पोस्टमास्तर' या गोष्टी अशा भावनांच्या दृष्टीनं खरोखर लक्षात घेण्यासारख्या आहेत. त्यामुळं विश्वात्मक पातळीवर भावनांचं आढळणारं हे साम्य खरोखरच विलक्षण आणि कमालीचं हृदयस्पर्शी असतं असा अनुभव आल्याखेरीज राहात नाही.

'मीठ-पाव'–'मीठ-भाकर' किंवा 'चषक'-'चाषका'. असे सारखे दिसणारे रीतिरिवाज आणि शब्दसाम्य व तौलनिक अभ्यासाच्या दृष्टीनं त्यांनी मांडलेले विचार लक्षणीय वाटतात.

अलेक्सांद्र पुश्किन – डॉ. पंडित आवळीकर,
प्रकाशक : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
जून १९७७, मूल्य : रुपये सहा.

⊗ ⊗ ⊗

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संशोधनात्मक, समीक्षणात्मक, तत्त्वज्ञान, कथा व आदी ललित लेखनाने बहरलेले

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. बा. प्रभुदेसाई / विभक्तिविमर्शाच्या संदर्भात 'पंचमी' आणि 'सप्तमी'

मराठीच्या व्याकरणातील सनातन कुतूहलाच्या व वादाच्या विषयांपैकी विभक्तिविमर्श हा एक होय. आतापर्यंत यासंबंधी विद्वानांनी साधकबाधक अशी भरपूर चर्चा केलेली असली तरी, मराठीत एकूण विभक्तींची संख्या किती व ती कोणती याचे नेमके आणि निश्चित उत्तर देणे एकंदरीत अवघडच आहे. "मराठीच्या व्याकरणातील 'प्रथमा' आणि 'संबोधन'" या माझ्या लेखात 'प्रथमा' व 'संबोधन' या विभक्तीविषयी मी काही विचार व्यक्त केले होते. (युगवाणी डिसेंबर, १९७७-जानेवारी १९७८, पृ. २१७–२१८.) येथे **'पंचमी,'** आणि **'सप्तमी'** या विभक्तींविषयीची सत्यपरिस्थिती दिग्दर्शित करावी असा प्रयत्न आहे. या दोन विभक्ती तुलनेसाठी एकत्र का आणल्या हे ही पुढील विवेचनावरून ध्यानात येईल.

रामचंद्र भिकाजी जोशी यांनी आपल्या **'प्रौढबोध मराठी व्याकरणा'**त (आवृत्ती सहावी, पुणे, १९२३) विभक्तिविषयाचा सविस्तर परामर्श घेतलेला आढळतो. या ग्रंथातील **प्रकरण–९ विभक्तिविचार, प्रकरण–१२ विभक्तिविचार–भाग दुसरा** आणि **प्रकरण–२० कारकविचार** ही या दृष्टीने पाहावीत.

"ऐतिहासिकदृष्ट्या मराठीत (१) प्रथमा आणि द्वितीया, (२) तृतीया, (३) चतुर्थी (मूळची षष्ठी), (४) पंचमी, (५) सप्तमी आणि (६) संबोधन, अशा सहा विभक्ती येतात," असा निष्कर्ष काढताना रा. भि. जोशी यांनी स्पष्टीकरण दिले आहे ते असे :– "विभक्ती किती आणि कशा मानाव्या यासंबंधाने मराठी व्याकरणकारांत मतभेद आहे. पण वास्तविक तो मतभेद अगदी अल्प म्हणजे फक्त द्वितीयेच्या संबंधाचा आहे. तो तेव्हाच काढून टाकता येईल. अमक्या रूपास विभक्तीचे नाव कोणते द्यावे, हा विचार केवळ व्यवस्थेचा आणि भाषेचा अभ्यास करणाऱ्यांच्या सोईचा आहे. त्यात सशास्त्राशास्त्रतेचा भाग नाही. यासाठी विभक्ती मानण्याची व्यवस्था करणे ती शिकणारांच्या सोयीचा विचार करून करावी." मराठीतील 'पंचमी' व 'सप्तमी' या विभक्तिप्रत्ययांची मूलपीठिका आणि त्यांचा उपयोग कसा होतो याविषयीच्या श्री. जोशी यांनी केलेल्या विवेचनातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे आहे :—

पंचमी—

"(अ) प्राकृतात पंचमीचे प्रत्यय 'हितो' आणि 'सुंतो' असे आहेत. त्यांवरून 'हून' आणि प्रांतिक प्रत्यय 'सून' (उदा. मुंबईसून, घरसून इ.) हे झाले असावे, असे कित्येकांचे मत आहे. मग 'हून' यातील हकार जाऊन 'ऊन' हा प्रत्यय झाला.

(आ) ही मूलपीठिका योग्य दिसत नाही. प्राकृत भाषांत पंचमी तृतीयेमध्ये लोप पावली. नंतर सध्याची मराठी पंचमी ही नवीनच उत्पन्न झाली. डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांनी असे प्रतिपादिले आहे की, 'हून' हा प्रत्यय 'होऊन' या धातुसाधित अव्ययापासून आणि 'सून' हा 'असून' यापासून झाला. 'घराहून' म्हणजे 'घर होऊन' म्हणजे 'घर आहे तेथून'. 'मुंबईसून' म्हणजे 'मुंबई शहर आहे किवा असते, तेथून'. 'होऊन' याचे 'हून' असे होईल. कारण, 'मी होऊन असे करणार नाही'. 'तो होऊन तेथे गेला तर बरे'. अशा वाक्यांत आपण 'मी-हून', 'तो-हून' असे म्हणतो. 'असून' यातील 'अ' जाऊन 'सून' असे रूप होईल. संस्कृतात पुष्कळ रूपांत 'अस्' धातूच्या 'अ' चा लोप होतो. कोकणी पोटभाषेत 'अस्' धातूच्या 'अ' चा नेहमी लोप होतो. जसे,– 'मे सलों'. 'तू सस'. 'तू सलोस.' 'तो से'. 'ते सत.' इत्यादी. बंगाली भाषेत 'होऊन' याचे स्वरूप 'हइते' आहे व 'घरहइते आसिलाम्' किवा 'वृक्ष हइते फल पडिल' 'वृक्ष आहे तेथून वृक्षावरून फळ पडले' असा उपयोग होतो. हिंदी भाषेत, 'बनारस होके आया हूं' असा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपयोग आहे. 'होऊन' असे रूप घालून पंचमी केल्याची जुन्या भाषेतली उदाहरणे :—.

(१) 'पाताळा होऊनी निम्न।
जियेचिये उंचिये सानें गगन,
जियें पाहातां त्रिभुवन।
अणुहि नव्हे'—ज्ञानेश्वरी १६–३३१.

यात 'पाताळा होऊनी निम्न' म्हणजे 'पाताळाहून पाताळ आहे त्याहून ठेंगणे, खोल' असा अर्थ.

(६) काळोख होऊनु उजुवाडू बरवा काय,
ऐसे कवणुइ न पुसे'
—ख्रिस्तपुराण, प्रस्तावना.

(८) 'इजिप्ता–होऊनी आलियावरी।
भरले तिन्ही मासवेरी,
लोकू क्रमीनु पातले पुढारी।
सिनाई पर्वतीं'
—पहिले पुराण,

टीप—

१. ख्रिस्त पुराणात जेथे पंचमीचा उपयोग आहे, तेथे सर्वत्र 'होऊन' असाच प्रत्यय आहे.

२. सागर प्रांतात 'मी नागपुराहून येतो', नागपुरास जाऊन येतो, याबद्दल 'नागपुरास होऊन येतो' असे म्हणण्याचा प्रघात आहे.

(इ) 'म्हणून', 'करून', 'बोलून' ही रूपे ज्ञानेश्वरीमध्ये 'म्हणौनि', 'करौनि', बोलौनि', अशीच सर्वत्र आढळतात. तसेच पंचमीची रूपे 'कष्टौनि' (कष्टाहून), 'मेघौनि' (मेघाहून, मेघापासून), 'जन्मौनि', 'ठाउनि' (स्थाना-हून-पासून), अशी अनेक ठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरीत आणि जुन्या गद्यलेखातही पंचमीचा प्रत्यय 'होन', 'होनि', 'होनी' असा अनेक ठिकाणी आलेला आहे. त्यावरून 'होऊन', 'असून या 'ऊन' प्रत्ययात धातुसाधित अव्ययांवरून 'हून' आणि त्यावरून पुढे 'ऊन' प्रत्यय झाला, अशी पूर्वपीठिकाच योग्य आहे. 'ऊन' हा प्रत्यय अगदी क्वचित येतो. तो कित्येक अव्ययांना लागतो. उदा. घरून, हातून,— नामें; वरून, खालून, मागून, पुढून, इत्यादी. ही स्थलवाचक अव्यये आहेत.

टीप :— कोणी 'तून' असा प्रत्यय देतात. पण तो प्रत्यय नव्हे. 'आंतून' असे पंचम्यर्थक शब्दयोगी अव्यय असून त्याचा संधी झाला आहे.

(ई) नवीन प्रत्यय 'पासीं (पाशीं), 'पासाव', 'पासून' हे 'पार्श्वे', 'पार्श्व' या संस्कृत शब्दांवरून आले आहेत."

सप्तमी

"(अ) चालू मराठी भाषेत बहुधा शब्दयोगी अव्ययाच्या योगाने सप्तमीची रूपे करितात. सप्तमीचे प्रत्यय म्हणून जे आहेत, ते लागून सप्तमीची रूपे फार थोड्या नामांची होतात.

(आ) 'आं' हा प्रत्यय किंवा सप्तमीचे 'आं' अन्ती असलेले रूप हे मूळचे प्राकृतातील सामान्य रूप आहे. 'ए' प्रत्यय क्वचित कवितेत आढळतो, तो संस्कृताच्या अनुकरणाने होतो. 'ईं' हा प्रत्यय, संस्कृतातील 'स्मिन्' आणि प्राकृतातील 'म्मि' प्रत्ययावरून झाला. हिन्दीत आणि गुजराथीत याच प्रत्ययावरून अनुक्रमे 'में' आणि 'मां' असे प्रत्यय झाले आहेत.

(इ) 'आं' हा प्रत्यय कवितेत आणि जुन्या भाषेत थोड्या आकारान्त पुल्लिंगी नामांस होतो. जसे,—'गळां पडेल.' गळां मुक्ताहार किंवा माळ'. 'माथां जटाभार' इत्यादी.

टीप :—

'पाय' या शब्दास चालू भाषेत 'आं' प्रत्यय होतो. उदा.— 'पायां पडणे.'

(ई) 'ईं' प्रत्यय थोड्या अकारान्त पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी नामांस विशेषत: कवितेत आणि चालू भाषेतल्या काही ठरीव वाक्यांत होतो. उदा.— 'ही गोष्ट माझ्या **कानीं** आली आहे. **माझ्या** हातीं काही नाही'. 'विष्णू कौसल्येच्या **उदरीं** जन्मास आले. त्याचप्रमाणे घरीं, दारीं, मुखीं, तोंडीं, रात्रीं, दिवशीं, पदरीं, इत्यादी.

टीप—

१. कोणी 'त' असा एक सप्तमीचा प्रत्यय देतात, पण ते 'आंत' असे शब्दयोगी अव्यय आहे. वरील प्रत्यय लागून होणाऱ्या सप्तमीच्या रूपांच्या अन्ती नेहमी अनुस्वार येतो.

२. सप्तमीचा नवीन प्रत्यय 'भीतरीं' हा 'अभ्यंतरीं' यावरून आला. 'माजी' आणि 'माझारीं' हे 'मध्य' आणि 'मध्यंतर' यांपासून झालेले दिसतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. विभक्तींचे जे नवीन प्रत्यय मागे सांगितले आहेत, त्यांतील काहींची व्युत्पत्ती दिली आहे. बाकीच्यांची सहज लक्षात येण्यासारखी आहे".

या दोन्हीं विभक्तींच्या संदर्भातील रा. भि. जोशी यांचा 'कारक-विचार' साररूपाने पुढील-प्रमाणे मांडता येईल :—

पंचमी

"१. पंचमीचा मुख्य अर्थ **अपादान** आहे. अपादान म्हणजे वियोग. या विभक्तीवरून ज्या स्थलाचा, वस्तूचा किंवा मनुष्याचा वियोग होतो, अथवा ज्यापासून कार्याची उत्पत्ती होते त्याचा बोध होतो.

२. ज्या पदार्थापासून किंवा स्थानापासून क्रियेची उत्पत्ती होते, तो पदार्थ किंवा स्थान पंचम्यन्त असते.

३. क्वचित् वियोगाचा अर्थ असता, ज्यापासून वियोग झाला, त्याजकडेसच क्रियेचे कर्तृत्व असते. अशा ठिकाणी **कर्तृपदार्थी पंचमी** असे म्हणावे. जसे— '**मजकडून** आज एक आंगठी हरवली.' '**रामापासून** किंवा **रामाकडून** काल शंभरांची नोट सांडली'. या उदाहरणांत 'हरवली' व 'सांडली' या क्रियांचे जनकत्व अनुक्रमे 'मी', व 'रामा' यांजकडे आहे.

४. विशेषणे घालून दोन पदार्थांची तुलना करावयाची असता पूर्वोक्त विशेषणांमागील नामे पंचम्यन्त असतात. उदा.– '**लोकरीहून** मऊ'. '**दगडाहून** कठीण'. '**दगडापेक्षा** वीट मऊ'. ही **तुलनार्थी पंचमी** होय.

टीप—**तुलनार्थी पंचमी** असता, तुलना दोनच पदार्थांमध्ये किंवा दोन पदार्थसमुदायांमध्ये केली असली पाहिजे व ते पदार्थ किंवा समुदाय परस्परां-पासून भिन्न पाहिजेत. पुष्कळ पदार्थांपैकी एकाचीच बाकीच्याशी तुलना कर्तव्य असता **सप्तमी** घालितात. जसे—'तो आपल्या वर्गातील सर्व **मुलांत** उंच आहे'. येथे सर्व 'मुलां-पेक्षा-हून उंच आहे', असे म्हणणे चुकीचे होईल. कारण 'सर्व मुलांत' तो-सुद्धा येतो.

५. दोन स्थळांमधील अंतर किंवा काळाचा अवधी दाखवावयाचा असता ज्या स्थळापासून किंवा काळापासून मोजणी करावयाची तद्वाचक शब्दाची पंचमी योजितात. जसे— '**काशीहून** मुंबई सातशे मैल आहे.' '**कालपासून** मला चैन पडत नाही.' हीस अर्थानुरोधाने **स्थलार्थी** किंवा **कालार्थी** पंचमी असे म्हणावे."

वरील **टीपेत** रा. भि. जोशी यांनी '**पंचमी**' आणि '**सप्तमी**' या विभक्तींचे दिग्दर्शित केलेले परस्परसंबंध लक्ष वेधून घेणारे आहेत.

आता श्री. जोशी यांचा सप्तमीविषयक कारकविचार जाणून घेऊ :—

सप्तमी

"१. ज्या स्थळी क्रिया घडते त्यास अधिकरण म्हणतात. त्या स्थलाच्या वाचक जो शब्द तो सप्तम्यन्त असतो. या सप्तमीचा अर्थ अधिकरण.

२. ज्या काळी क्रिया घडते तो काळ दाखविण्या-करिता सप्तमी योजितात. ही कालार्थी सप्तमी.

३. अनेक व्यक्तींतून एकच व्यक्ती विशिष्ट गुणांत श्रेष्ठ आहे, असे दाखवावयाचे असता, अनेक व्यक्तींचा वाचक शब्द सप्तमीत घालितात. ही तुलनार्थी सप्तमी.

४. श्रद्धा, विश्वास, आसक्ती, प्रीती वगैरे अर्थाची नामे किंवा क्रियापदे वाक्यात असता, ज्याच्या ठिकाणी श्रद्धा वगैरे दाखवायची त्याची सप्तमी होते. उदा. 'त्याची विष्णूच्या ठायीं किंवा विष्णूवर मोठी भक्ती आहे.' ही अधिकरणार्थी सप्तमी.

५. व्यग्र, तत्पर, चूर, वगैरे 'गुंतलेला' किंवा 'गढलेला' ... अर्थाची विशेषणे, व कुशल, निपुण, चतुर, धूर्त, प्रवीण, पटु, पंडित, हुषार, चपळ, पारंगत, इ. विशेषणे, ही ज्या कार्यांत गढलेला असे दर्शविणे असेल, त्याची किंवा ज्या गुणांत प्रावीण्य वगैरे दाखवावयाचे असेल, त्याची सप्तमी घेतात. जसे,—'दुःखात व्यग्र'. 'व्याकरणांत पंडित'. धावण्यांत चपळ.' हिलाही अधिकरणार्थी सप्तमी म्हणावे.

६. 'ईं' हा सप्तमीचा प्रत्यय लागून झालेल्या नामांच्या रूपांना संबंधी विशेषणांचा 'च' प्रत्यय लागून विशेषणे होतात. जसे,—'मनींचा' 'ठायींचा'.

टीप :—

ही 'च' प्रत्यय लागून होणारी विशेषणे विशेषतः स्थलार्थी आणि कालार्थी सप्तमीची रूपे असतील, तेव्हाच होतात असे दिसून येईल."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रा. भि. जोशी यांचे पंचमी व सप्तमी विभक्ती-विषयीचे विवेचन मुद्दामच येथे उद्धृत केले आहे. व्युत्पत्तींच्या म्हणजे ऐतिहासिक आणि व्यावहारिक ("शिकणारांच्या सोयीचा") अशा उभय दृष्टिकोनांतून तत्कालीन मराठी वैयाकरणांनी केलेल्या विचार मंथनाचे प्रतिबिंब त्यात उत्कृष्टपणे साकार झाले आहे, यात काही शंका नाही. विवेचनाच्या ओघात श्री. जोशी यांनी दिलेल्या 'टीपा' या त्यांच्या सखोल अभ्यासाच्या द्योतक वाटतात. त्यांनी पंचमी व सप्तमी या विभक्तींचे सोदाहरण वर्णिलेले उपप्रकार, त्याचप्रमाणे या दोन्ही विभक्तींच्या परस्परसंबंधावर टाकलेला प्रकाश यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा.

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'पंचमी' व 'सप्तमी' या दोन्ही विभक्तींचे प्रत्यय दिले आहेत. (**मराठी व्याकरणावरील निबंध**, आवृत्ती तिसरी, पुणे १९२३). पंचमी विभक्तींच्या प्रत्ययांचा वेगळेपणा चिपळूणकरांनाही जाणवला होता हे त्यांच्या दादोबा पांडुरंगांचा संदर्भ देऊन केलेल्या पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

"पचमी :— 'ऊन' हा प्रत्यय काही थोडयाशा अकारांत पुल्लिंगी व नपुंसकलिंगी शब्दांस मात्र लागतो. जसे धरून, हातून इत्यादी. हा प्रत्यय लागताना पररूप संधी होतो; सामान्यरूप होत नाही. हा प्रत्यय फार जुना दिसतो. व हाच प्रत्यय लागून कितीएक शब्द सिद्ध झाले आहेत, ज्यांस अव्ययें म्हणतात. जसे, पासून मागून, जवळून, खालून इत्यादी. पंचमी विभक्तीच्या विद्यमान प्रत्ययांत या 'ऊन' प्रत्ययास मात्र संस्कृतातल्या पंचमीप्रमाणे कारणत्व किंवा हेतुत्व यांचा बोध करण्याचे सामर्थ्य आहे. जसे, "त्याच्या हातून हे काम झाले" येथे 'हातून' याचा 'हातानें' असा अर्थ आहे.

'ऊन' प्रत्ययाविषयी दादोबा असे म्हणतात की, "स्थानाचे अथवा अधिकरणाचे वाचक जितके पुल्लिंगी व नपुंसकलिंगी द्व्यक्षरी प्राकृत शब्द आहेत त्यांवरून पंचम्यर्थी हा प्रत्यय होत असतो, सर्वत्र होत नाही." असे लिहून त्यांनी हातून, तोंडून ही उदाहरणे दिली आहेत. या स्थली हात व तोंड हे शब्द स्थलवाचक अथवा अधिकरणवाचक कसे हे आम्हांस कळत नाही. दादोबांनी लिहिलेल्या वरील नियमावरून त्या प्रत्ययाचा पुष्कळ प्रयोग आहे असे दिसते. परंतु वास्तविक पाहिले असता त्यांनी सांगितलेल्या प्रकारच्या शब्दांत तो प्रत्यय शेकडा पाचांस सुद्धा लागतो असे म्हणता येत नाही. तसेच त्यांनी वरच्या नियमात द्व्यक्षर शब्दांस असा विशेष केला आहे; परंतु प्रकृति शब्दातील अक्षर संख्येवर तो प्रत्यय लागण्याचा अनुगम आहे असे आम्हांस वाटत नाही. वास्तविक पाहता 'मुलगी माहेरून सासरी गेली' इ. ठिकाणी त्र्यक्षर शब्दावरूनही तो प्रत्यय येतो." (पृ. ७४-७५)

मोरो केशव दामले यांनी कृ. चिपळूणकर आणि दादोबा यांच्या विवेचनाची उचित दखल घेऊन पंचमीच्या प्रत्ययांविषयी खास स्वतःचे असे जे मतप्रदर्शन केले आहे त्याचाही निर्देश करणे आवश्यक वाटते. (**शास्त्रीय मराठी व्याकरण**, आवृत्ती दुसरी, मुंबई १९२५, पृ. ३५९–३६०).

"दादोबांनी आणखी एक तून हा प्रत्यय पंचमी-मध्ये दिला आहे. परंतु त्याची काही आवश्यकता दिसत नाही. 'जसा ँत हा सप्तमीचा प्रत्यय मानावा, तसा ँतून हा साधिकरण अपादानार्थ ह्याचा वाचक पंचमीचा प्रत्यय मानल्यास व्याकरण करितेसमयी पुष्कळ अडचणी दूर होतील.' 'असे न केले तर व्याकरणपदच्छेद करण्यास मोठी अडचण पडेल' असे दादोबा म्हणतात. परंतु गांवांत शेंगेंत, उत्तरेंत ही सप्तमीची रूपे एकदा सिद्ध झाली म्हणजे त्यांस पुढे ऊन हा वरील प्रत्यय आपादानार्थी लागतो असे म्हटले म्हणजे झाले. म्हणजे ज्याप्रमाणे देशींचा, प्रांतींचा या शब्दांमध्ये देशीं, प्रांतीं, ह्या सप्तमीच्या रूपांस चा हा षष्ठीचा प्रत्यय लागला आहे, त्याचप्रमाणे गांवांत, शेंगेंत दक्षिणेंत, ह्या सप्तमीच्या रूपांस ऊन हा पंचमीचा प्रत्यय लागला आहे. ज्याप्रमाणे रामाच्यानें, तुमच्यानें, माझ्यानें ह्यांस सविकरण तृतीया असे म्हणतात, त्याचप्रमाणे देशींचा, प्रांतींचा, ही साधिकरण षष्ठी, आणि गांवांतून, शेंगेंतून, ही साधिकरण पंचमी असे म्हटले म्हणजे झाले. त्यायोगे दादोबांची, 'व्याकरणपदच्छेद करण्याची मोठी अडचण'ही दूर होतेच.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पंचमीचा हून हा प्रत्यय द्व्यक्षरी शब्दासारखाच किंवा शब्दयोगी अव्ययासारखाच काही अंशी असल्यामुळे म्हणजे संक्षिप्त किंवा आटपसर नसल्यामुळे पंचमीच्या अर्थी बहुधा 'पासून' ह्या शब्दयोगी अव्ययाचाच पुष्कळ उपयोग होतो."

मो. के. दामले यांनी वरील उताऱ्यात "पंचमीचा प्रत्यय द्व्यक्षरी शब्दासारखाच काही अंशी" असल्याचे महत्त्वाचे विधान केले आहे. दामल्यांचे हेच सूत्र पकडून पुढे अरविंद मंगरूळकर यांनी पंचमी आणि सप्तमी या विभक्तींचा विचार केलेला आढळतो. (**मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार**, पुणे, १९६४, पृ. १३७–१४०.)

रा. भि. जोशी, दादोबा, कृ. चिपळूणकर, मो. के. दामले या सर्व वैयाकरणांनी पंचमी व सप्तमी या दोन्ही विभक्तींचा समावेश मराठीच्या व्याकरणात केलेला आहे. अरविंद मंगरूळकर यांनी मात्र पंचमी व सप्तमी या विभक्तिसमूहातून पूर्णपणे गाळून टाकल्या आहेत.

यासंबंधीच्या विवेचनात प्रा. मंगरूळकर लिहितात—"मराठीच्या विभक्तींमध्ये द्व्यक्षरी प्रत्यय फक्त पंचमीच्याच बाबतीत दिसतात. त्यामुळे तिच्या विभक्तित्वाविषयी प्रथम संशय उत्पन्न होतो." दामल्यांच्या वर उद्धृत केलेल्या विधानाचे प्रस्तुत मंगरूळकरांच्या विधानाशी असलेले विलक्षण साम्य सहज ध्यानात येईल.

पंचमी विभक्तीच्या प्रत्ययांपैकी 'पेक्षा' " हे शब्दयोगी अव्यय मानणे युक्त होय. शिवाय, त्याला वैयाकरण सहसा विभक्तिस्थान देत नाहीत. 'हून' आणि 'पेक्षा' हे पंचमीचे प्रत्यय न मानिता ती अनुयोगी अव्यये मानावीत"...

'ऊन' हा प्रत्यय एकवचनात का होईना पण काही नामांना तो लागतो आणि प्रा. मंगरूळकरांनी विभक्तींविषयीचे जे स्वतःचे म्हणून निकष सांगितले आहेत त्यांच्या कसोटींवरही हा प्रत्यय बऱ्हंशी उतरतो. पण हा प्रत्यय मानायचा नाही असा निर्णय घेण्यासाठी शास्त्रीयता बाजूला ठेवून मंगरूळकरांना कसा गमतीदार युक्तिवाद करावा लागला आहे पाहा :—"हा प्रत्यय अत्यल्पसंख्य नामांना लागतो. सर्वनामांना तर तो लागतच नाही. तेव्हा इतक्या थोड्या नामांना लागणाऱ्या आणि केवळ नामांनाच लागणाऱ्या अशा दोन अक्षरी एकवचनी, संशयास्पद, वैलक्षण्ययुक्त प्रत्ययासाठी स्वतंत्र विभक्ती मानणे म्हणजे पूर्वी एकदा म्हटल्याप्रमाणे नाल सापडला, म्हणून घोडा घेण्यासारखे आहे!"..."हून' हा पंचमीचा प्रत्यय सगळ्या नामांसर्वनामांना लागतो", हे त्यांना नाकबूल करता आलेले नाही एवढे खास!

विभक्तिविषयीच्या स्वतःच्याच निकषांना मुरड घालून मंगरूळकरांना तडजोड करावी लागली ती अशी.

सप्तमीच्या प्रत्ययांपैकी 'आं' प्रत्यय मान्य निकषांनुसार विभक्तिसमूहातून वगळणे अवघड झाले असते. पण पंचमीप्रमाणेच येथेही मंगरूळकरांना तो मानू नये यासाठी खूपच वकिली करावी लागली ती अशी :— "आं— प्रत्यय तर बोटांवर मोजण्याइतक्याच नामांना लागतो... आणि तोही शैलीदार ढंगाचा एक नमुना म्हणून.. ऊन-प्रत्यय जसा सर्वनामांना लागत नाही, तसाच आं प्रत्ययही सर्वनामांना लागत नाही. 'ई' हाही प्रत्यय केवळ नामांनाच लागतो... किंबहुना थोड्याच अ—कारान्त नामांना तो लागतो. या प्रत्ययांच्या ठिकाणी इतर विभक्तिप्रत्ययांपेक्षा वैलक्षण्य आहे. त्यामुळे हे वैलक्षण्य ध्यानी घेऊन आणि जमेस धरून सप्तमीच्या 'ई' आणि 'आं' या प्रत्ययांची नोंद वेगळ्या प्रकारे शेष प्रत्ययांत करणे हे युक्त आहे.. सप्तमीच्या 'त' या प्रत्ययाची गोष्ट याहून वेगळी आहे. त्याच्याही ठिकाणी वैलक्षण्य आहेच. ...एवंच, 'त' आणि 'ई' हे प्रत्यय शेष प्रत्ययांत समाविष्ट करावे; आणि 'आं हा अत्यल्पप्रयुक्त प्रत्यय स्वतंत्रपणे नोंदवावा."

पंचमी विभक्तीचे 'हून' आणि 'ऊन' त्याचप्रमाणे सप्तमीचा 'आं' हे "अत्यल्पप्रयुक्त" का होईना पण विभक्तिप्रत्यय मानावेत असा निष्कर्ष प्रा. मंगरूळकर यांनी दिलेल्या शास्त्रकाटयाच्या कसोटीवरच काढता येण्यासारखा आहे, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. केवळ शास्त्रदृष्ट्या निर्णय घ्यावयाचा झाल्यास हे प्रत्यय विभक्तिसमूहात वगळावेत यापेक्षा ते आहे तसेच राहू देणे इष्ट होईल यासाठीची कारणेच बळकट्तर वाटतात.

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

(कार्यवृत्त २६–१०–१९७८ ते २०–१२–१९७८)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ कोर्ट केसचा निकाल— श्री. गो. के. केळकर यांनी वि. सा. संघाविरुद्ध केलेल्या दाव्यात काहीच अर्थ नाही असा निकाल कोर्टाने दिला आहे आणि खर्च त्यांचेवरच बसविला आहे.

२. मराठी साहित्य महामंडळ

२.१ दि. १–१२–७८ मराठी साहित्य महामंडळातर्फे चंद्रपूर येथे भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणूकीचा निकाल निवडणूक अधिकारी डॉ. सुधाकर बडगे यांनी जाहीर केला. श्री. चोरघडे, वामन कृष्ण निवडून आले.

३. सांस्कृतिक कार्यक्रम

३.१ दि. १–१०–७८, कोल्हापूरचे सुप्रसिद्ध गायक रसिक अॅड. न. वि. उर्फ बाबुराव जोशी यांचे वृत्त, जाती, छंद, ह्यावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी श्री आ. रा. देशपांडे (अनिल) हे होते.

३.२ दि. २५–११–७८, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, येथील मराठी भाषा सल्लागार समितीची बैठक दि. २५ रोजी वि. सा. संघाच्या कार्यालयात झाली. त्याच दिवशी सायंकाळी गडकरी सभागृहामध्ये ह्या समितीचे सर्वश्री वसंत बापट, व्यंकटेश माडगूळकर, नरहर कुरुंदकर, श्री. पु. भागवत, डॉ. मधुकर आष्टीकर ह्या सदस्यांनी नागपूरातील साहित्यिकांशी चर्चा केली.

३.३ दि. १६–१२–७८, नवोदित कवींचे संम्मेलन आयोजित करण्यात आले. संचालन श्री. सुधाकर गायधनी यांनी केले. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते. कवी आणि रसिक श्रोत्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. ह्यामध्ये सर्वश्री प्रभाकर काळे, पद्माकर पाटील, उल्हास मनोहर, राजू मित्रा, लोकनाथ रायपुरे, निलकान्त कुलसंगे, रविंद्र पाठक, श्यामकांत कुळकर्णी, आत्माराम राठोड, रमेश कांबळे, उमाकांत न्याबाळकर, दे. शि. दुधलकर, कु. अरुणा पवार, लता ढोरे, नलीनी झाडे, रेखा भिवगडे, मृणाल चिचाळकर, ज्योति लांजेवार ह्यांनी भाग घेतला होता.

४. स्मृतिदिन व जयंती

४.१ दि. १९–११–७८, कै. वि. रा. हंवर्डे स्मृतिदिन—नाट्यसमिती तर्फे साजरा झाला. कै. हंवर्डे यांच्या साहित्य विषयक सेवेचा गौरव करणारी सर्वश्री प्रा. फणसाळकर, प्रा. म. ना. लोही, हरीष जानेफळकर, कुमारील भागवत आणि विजय हंवर्डे यांची भाषणे झाली. सौ. कमल आंबेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४.२ दि. २७–११–७८, स्मृतिदिनाप्रित्यर्थ कै. ग. त्र्य. माडखोलकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.

४.३ दि. ६–१२–७८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.

४.४ दि. १०–१२–७८, मराठी साहित्य संघाचे कार्यवाह, श्रीपाद् शंकर उर्फ काकासाहेब नवरे, सुप्रसिद्ध पत्रकार, मुंबई, यांचे निधनाबद्दल शोकसभा घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ह्या प्रसंगी श्री बाबुराव उळाभाजे, श्री देशपांडे, श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) ह्यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते.

४.५ दि. १४–१२–७८, कै. ग. दि. माडगूळकर ह्यांच्या प्रथम पुण्यतिथि दिनी, त्यांच्या गीतांच्या कार्यक्रमाने संगीतमय आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे आयोजन सौ. कमल आंबेकर यांनी केले. कार्यक्रमात शरद सुतवणे, श्री. गोपाळ कौशीक, श्रीमती सुशिला दामले, सौ. संगीता पाटक, सौ. शिला अभ्यंकर, कु. ललीता पटवर्धन, कु. माधुरी सुतवणे, कु. माधवी काळे यांनी ग. दि. मां. ची भावगीते व गीत रामायणातील गीते सादर केली. कार्यक्रमाचा समारोप डॉ. आष्टीकर यांनी केला.

५. सन्माननीयाच्या भेटी

५.१ दि. १८–११–७८, श्री. वी. एम. गोगटे, बेळगावचे उद्योगपती यांनी वि. सा. संघाला भेट दिली त्यावेळी संघाच्या कार्याची माहिती त्यांना देण्यात आली.

६. नाट्य समिति :

६.१ दि. ५–११–७८, रंगभूमि दिन समारंभ साजरा करण्यात आला. नांदी गायन व त्यानंतर नटराजाचे पूजन करण्यात आले. नाट्य चळवळीचे प्रवर्तक अमरावतीचे कै. बाबुराव थुगावकर ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नंतर डॉ. वसंतराव देशपांडे यांचे नाट्य, संगीत सौ. शुभांगी रानडे यांचे सतार वादन, कु. स्मिता जोशी, डॉ. सौ. आशा देशपांडे व दीपक भानारकर यांची स्वगते, कु. संध्या पांडे हिचे कथ्थक नृत्य, इशान कापूसकर व कु. रेखा पातूरकर यांचे बेला वादन, बाळ नाइक ह्यांची भक्तिगीते आणि श्री. महेश पातुरकर दिग्दर्शित व नाट्य समितीने सादर केलेली 'अंगाई' ही एकांकिका होऊन कार्यक्रम संपला.

६.२ दि. ११–११–७८, घर आंगण याच्या अंतर्गत "रंग स्वानंद" ह्या संस्थेने "यमाचा दरबार" ही एकांकिका सादर केली.

७ संगीत समिती :

७.१ दि. १२–११–७८, जयपूर घराण्याची गायकी म्हणणाऱ्या कु. श्रुती सडोलीकर यांच्या सकाळच्या रागदारीचा बहारदार कार्यक्रम धनवटे रंगमंदिरात झाला. श्री. श्रीराम सप्रे यांनी हार्मोनियमची साथ फारच मनोरम केली. तबल्याची साथ श्री. प्रल्हाद भजनी ह्यांनी केली.

७.२ दि. ३–१२–७८, संगीत अलंकार स्व. पंडित शंकरराव सप्रे स्मृति प्रित्यर्थ संगीत स्पर्धा झाल्या. ह्या स्पर्धा रविवार दि. ३–१२–७८ रोजी गडकरी सभागृहात घेण्यात आल्या. एकंदर १३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेमध्ये कु. विद्या हस्तक, प्रथम क्रमांक, रोख बक्षीस रु. ७५/-, (२) श्रीमती ललिता पाटणकर, द्वितीय क्रमांक, रोख बक्षीस रु. ५०/- आणि (३) कु. ललिता फडणवीस, तिसरा क्रमांक, रोख बक्षीस

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

रु. २५/- अशी पारितोषिके देण्यात आली. गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत विशारद परिक्षेत नागपूर केन्द्रात प्रथम आल्याबद्दल श्री. मिलिंद पावडे ह्यांना बक्षीस रोख रु. २५/- आणि नागपूर विद्यापीठातून एम्. ए. संगीत परिक्षेत प्रथम आल्याबद्दल कु. मंदाकिनी कोल्हटकर ह्याना बक्षीस रोख रु. २५/- देण्यात आले. ह्याशिवाय कु. उज्वला जावडेकर ह्यांना श्री. गटलेवार यांनी वैयक्तिक रु. ११/- चे रोख बक्षीस दिले.

परीक्षक म्हणून श्री. के. एल. जाधव, श्री. पा. ना. गटलेवार आणि श्रीमती नंदनपवार हे होते.

बक्षीस समारंभ वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते करण्यात आला.

८. परीक्षा समिती :

८.१ दीक्षान्त समारंभ दि. ११–१२–७८ रोजी गडकरी सभागृहात महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी नेते प्रा. श्री. राम मेघे यांचे हस्ते प्रथम सत्रीय हेमंत प्रमाणपत्र व पारितोषिक वितरण समारंभ साजरा झाला. प्रस्तुत समारंभात भारतीय भाषाध्ययन मंदीराच्या सौ. भाग्यश्री प्रमोद काळीकर यांना सप्टेंबर, १९७८ सत्रात एम्. ए. समकक्ष साहित्य पारंगत परीक्षेत सर्व प्रथम आल्याबद्दल डॉ. वा. ग. सिंगणापूरकर सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.

८.२ स्थानिक प्रचार दौरा— परीक्षा समितीचे सदस्य श्री. म. ना. काळे आणि परीक्षा संचालक यांनी पूर्व नागपूरातील सुमारे २० शिक्षण संस्थांना भेट दिली. त्यामुळे आगामी सत्रात सुमारे १५ नव्या केन्द्रांची भर पडत आहे.

८.३ साहित्य व शासकीय परीक्षांचे वर्ग — जानेवारी, १९७९ च्या सत्रासाठी साहित्य स्नातक आणि साहित्य पारंगत या परीक्षांचे वर्ग केन्द्र कार्यालयात परीक्षा संचालक प्रा. माणिक के. बेतुले आणि डॉ. सौ. शकुंतला खोत, तसेच शासकीय अमराठी कर्मचाऱ्यांसाठी प्राज्ञ परीक्षेचे वर्ग श्री. भा. य. लांबे आणि श्री. हरिहरराव येगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहेत.

९. शाखावृत्त

९.१ अचलपूर शाखा—दि. १–१२–७८, गजाननराव वाटवे यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला दि. ३–१२–७८ "कथाकथनाचा" कार्यक्रम सार्वजनिक वाचनालय, परतवाडा, येथे झाला. यात विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी भाग घेतला होता. 'अ' गटातील पारितोषिक जानकीबाई कन्या शाळा, 'ब' गटातील पारितोषिक बॉईज हायस्कुल आणि प्रौढ गटातील 'क' वर्गाचे पारितोषिक सौ. कमलाताई धर्माधिकारी यांना देण्यात आले. परिक्षक सौ. आसावरी कानेटकर आणि भय्यासाहेब धर्माधिकारी हे होते.

९.२ यवतमाळ शाखा—दि. २८–१०–७८ ला या शाखेची निवडणूक अविरोध पार पडली. ॲड. म. ग. मानकर, अध्यक्ष, श्री. आनंदराव सुभेदार, उपाध्यक्ष, श्री. दिनकर जयवंत, कार्यवाह, श्री. राजाभाऊ गोरे, सहकार्यवाह, कार्यकारिणी सदस्य सर्वश्री व. ना. एंकब्रोटे, प्रा. शरच्चंद्र टोंगो, स. शा. येवतीकर, अशोक भुतडा, म. ना. घोडे, रमेश मानकर आणि नाना राऊत. त्याच दिवशी प्रा. ना. सी. फडके यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

९.३ गोंडवण शाखा, चंद्रपूर—या शाखेचे कार्यकारी मंडळ, १९७८–७९ करिता खालीलप्रमाणे आहे. डॉ. तु. वि. पत्तीवार, अध्यक्ष, श्री. ग. ना. वैरागडे, उपाध्यक्ष, प्रा. शा. वा. रवान, सरचिटणीस श्री. भगवंतराव ठाकरे, कोषाध्यक्ष, सदस्य सर्वश्री के. जी. नागपूरे, पु. ह. धनकर, ज. गो. संत.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

९.४ मुर्तिजापूर शाखा—दि. ४–११–७८, अविष्कार नाट्य शाखेचे उद्घाटन श्री. प्रभाकर पुराणिक ह्यांचे हस्ते झाले. कथाकथनाच्या कार्यक्रमात विजय देशमुख, वसुधा घुरडे, पुष्पा मेढेकर आणि प्रभाकर पुराणिक यांनी भाग घेतला होता. ना. सी. फडके यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

९.५ आकोट शाखा—१९७८–७९ चे कार्यकारी मंडळ : प्रा. गु. मा. सोमवंशी, अध्यक्ष, प्रा. बजरंग सरोदे, उपाध्यक्ष, प्रा. रा. श्री. निचळ, सचिव, श्री. टी. एस. काळमेघ, सहसचिव, श्री. बी. बी. लव्हाळे, कोषाध्यक्ष व इतर सभासद सर्वश्री अविनाश सोमवंशी, रमेश हिंगणकर, बी. एस. भिसे, बी. डी. बहादुरे व न. ज. लोखंडे.

९.६ खामगाव शाखा—१९७८–७९ चे कार्यकारी मंडळ : अध्यक्ष, डॉ. पु. गो. एकबोटे, उपाध्यक्ष, प्रा. के. मा. मुनशी, कोषाध्यक्ष, डॉ. पु. म. पारसनीस, कार्यवाह, प्रा. गो. ह. सावर्जी, सहकार्यवाह, प्रा. सौ. विद्या कावडकर, सदस्य सर्वश्री श्या. ह. जावंधिया, भी. रा. जहागीरदार, मो. ज. देशपांडे, वि. गो. देशमुख आणि भवरलाल सेवक.

९.७ लाखनी शाखा—१९७८–७९ चे कार्यकारी मंडळ : अध्यक्ष, र. सि. गिऱ्हेपुंजे, उपाध्यक्ष, मा. शं. देशमुख, कोषाध्यक्ष, भा. गो. वंजारी, कार्यवाह, द. सा. बोरकर, सहकार्यवाह, शि. वा. फटींग, सदस्य सर्वश्री प्र. ल. पऱ्हाड, दि. प. लाखनीकर, व. कृ. हुकरे, श्री. रा. गिऱ्हेपुंजे, मा. म. खरावे, प्र. गो. साखरे, श्रीमती निर्मलाबाई निसाळ.

दि. १६–११–७८, प्रा. ना. सी. फडके यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

९.८ नवरगाव शाखा—दि. २२–९–७८, अस्थायी समिती स्थापन करण्यात आली. ती अशी अध्यक्ष–प्रा. सौ. उषाताई देशपांडे, उपाध्यक्ष–श्री. एकनाथराव निनावे, कार्यवाह–राजीव रा. घाटोळे, कोषाध्यक्ष–वामन निकुरे व सदस्य सर्वश्री प्रा. हंवर्डे, तामशेट्टीवार, वैरागडे, मोतीराम बोरकर.

९.९ नेर-नरसोपंत–दि. १०–११–७८–१९७८–७९ करिता कार्यकारी मंडळ झाले ते असे अध्यक्ष–नामदेवराव दशरथजी मिसाळ, उपाध्यक्ष–प्रा. पाटील, सरचिटणीस–श्रीरंग गोळे, चिटणीस–प्रा. देवस्थळे व सुधीर कुळकर्णी, खजीनदार–श्री. अजीत वापट, सदस्य सर्वश्री मधुकरराव पांडे, डॉ. मोहन शर्मा, सौ. देवस्थळे, पंडित पांडे, भैय्यासाहेब जगताप.

९.१० गोंदिया शाखा—दि. २४–९–७८, साहित्यिक प्रा. म. ना. अदवंत ह्यांचे मराठी रंगभूमी कालची आणि आजची या विषयावर व्याख्यान.

दि. २९–९–७८, गांधी जयंती निमित्त आंतर-महाविद्यालयीन व आंतर-शालेय निबंध स्पर्धा.

दि. १४–१०–७८, डॉ. मधुकर आष्टीकर लिखित माझा ज्ञानियांचा राजा या नाटकाचा प्रयोग प्रा. माधव पुराणिक यांनी दिग्दर्शन केले. याप्रसंगी गोंदियाचे नगराध्यक्ष, श्री. हरिहर पटेल यांनी वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेला ५०१ रु. ची देणगी दिली.

दि. २६–१०–७८, कै. ना. सी. फडके ह्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली.

दि. १०, ११, १२–१२–७८, कै. भाऊसाहेब कुळकर्णी व्याख्यानमालेत प्राचार्य राम शेवाळकर यांची कालिदासाच्या काव्यावर मेघदूत, कुमारसंभव व शाकुंतलवर व्याख्याने झाली.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ५३ वे अधिवेशन चंद्रपूर येथे जानेवारी १९७९ दि. ५, ६, ७ ला होणार आहे.

जास्त माहितीसाठी :–

वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२ ह्या पत्त्यावर चौकशी करावी.

किंवा

संयोजक, अखिल **भारतीय मराठी साहित्य संमेलन**, सरदार पटेल महाविद्यालय, मंडई वार्ड, चंद्रपूर–४४२४०१ यांच्याशी पत्रव्यवहार करावा.

खुलासा

'युगवाणी' दिवाळी अंक १९७८ चे मुखपृष्ठ

श्री. भाऊ समर्थ यांचे होते.

–संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता

सगुणा पुजारी / निखाऱ्यांना कोळसे करणाऱ्यांनो--

निखाऱ्यांना कोळसे करणाऱ्यांनो
जरा जपून
तुमचे हात पोळणार नसतील तरी;
काळे होणार आहेत--
ते तोंडाला लागू देऊ नका.
चालेल तोपर्यंत खुशाल करा
हा धंदा
भस्मासुराची बेभानता स्वतःहून संपते.
धंदेवाईक प्रेषितांनो,
अमाप आश्वासने देत बसू नका
केवळ देता येतात म्हणून !
आम्हालाही कळते
प्राणवायू झाला तरी काय ?
नसलेले प्राण त्यालाही देता येत नाहीत
अरे !
त्याला स्वतःलासुद्धा प्राण नसतो !

लँगस्टन ह्यूज; अनु० बी. रंगराव / (तीन कविता)

(१) निग्रो नद्यांविषयी बोलतो आहे :

मी नद्या पाहिल्या आहेत--
जगाइतक्या प्राचीन आणि माणसांच्या धमन्यात
वाहणाऱ्या रक्तापेक्षाही म्हाताऱ्या नद्या
पाहिल्या आहेत.
उगवत्या सूर्याबरोबर मी युफ्रेटिसमध्ये पोहलो आहे;
कांगोच्या किनाऱ्यावर,
तिच्या प्रवाहाच्या संथ लयीत मी
माझ्या आयुष्याची स्वप्नं पाहिली आहेत;
नाईलने माझ्या कानात,
पिऱ्यामिड्‌चे रहस्य सांगितले आहे;
अेब लिंकन न्यू ऑरलिन्सला,
जाताना त्याच्यासाठी
मिसीसिपीनं गायिलेली गीतं मी ऐकली आहेत,
आणि तिचं मळकं हृदय सूर्यास्तात
सोनेरी झालेलं मी पाहिलं आहे.
मी नद्या पाहिल्या आहेत.
प्राचीन, धूसर नद्या मी पाहिल्या आहेत.
आता माझा आत्मा नद्यांसारखा खोल-खोल झाला आहे.

(२) बर्मिंग हॅम सण्डे :

(१५ सप्टेंबर, १९६५)

चार छोट्या मुली--
त्या दिवशी सण्डे स्कूलला गेल्या
आणि पुन्हा परत घरी आल्याच नाहीत.
त्यांच्या रक्ताने लाल झालेल्या भिंती,
माखलेले कपडे
हजारो वर्षांपूर्वी चीनमध्ये बनलेल्या
डायन्यामाइटने जाळलेत--
बर्मिंगहॅमच्या भिंतीवरील याच रक्ताने प्रेरित होऊन
आज चीन लाल झाला, असेल कदाचित . . .
त्या भिंतीवर आपले रक्त सांडवून चार छोट्या मुली
आज कबरीत शांत झोपल्या आहेत.
प्राचीन ड्रॅगॉन राजाच्याही शक्तीला लाजविणाऱ्या
डायन्यामाइटची गीतं--
पृथ्वीवर स्वर्ग आणण्याच्या इच्छेने
कुण्याही ख्रिश्चन शाळेत न शिकविलेली--
गायल्या जात आहेत आज घरोघरी.
इथल्या मिळमिळीत वातावरणात विसावलेल्या या मुली
या गीतांनी आज जाग्याही होतील कदाचित . . .

(३) गाणं . . . आत्महत्त्येसाठी

समुद्र खोल आहे
चाकू धारदार,
विष जहाल आहे
पिस्तोल छानदार--
समर्थ आहेत सर्व ते द्यावया शांती तुला !
त्रस्त आत्म्याला हवी जी
गाढ चिर निद्रा,
शेवटी देती तुला ती
शून्य, शांत मुद्रा.
त्यापुढे कुणी तुला ना छेडील रे काळचा मुला !

युगवाणी

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रात, १९२३

श्रीकृष्ण राऊत / डोक्यावर जुलमी आभाळ

डोक्यावर जुलमी आभाळ अन्
पायाखाली सरकती वाळू
अशा अधांतरी आयुष्याचा हात
हातात असताना, कसे पुढे रेटावे ?
ह्या प्रदेशातला वाराही मोठा शिरजोर
समोरून सरळ छातीवर येऊन आदळतो.
आपली दिशा कोणती ?
हे स्वच्छ समजायच्या आतच
दाही दिशा काळोखाने जिंकलेल्या.
मग बकाल गावातल्या निर्वासितासारखे
आपण स्वतःच्याच श्वासांच्या आडोशाला
शांतपणे पहुडावे
रक्तातले दिवे मालवून...

धर्मराज निमसरकर / गस्त घालणारे डोळे

डोळ्यांनी काळोख रात्रभर
गस्त घातलेल्याचा दावा केल्यावर
समुद्रपक्षांनी आपल्या एकएका इंद्रियाचा अहेर
समारंभपूर्वक अर्पण केला.
डोळ्यात सूर्य धगधगतो आहेची
साक्ष पटल्यावर आपले पंखही भावनातिरेकात
अर्पण करण्याचा उत्सव पार पाडला.
अशा वेळी वैयक्तिक मालकी हक्क सांगणाऱ्या वेटावर
वाढलेल्या जंगलातून खदखदून हसण्याचा आवाज
ढगाच्छादित आसमंतात पसरला.
समुद्रपक्षी ग्लानीत होते
म्लान झालेल्या चेहऱ्यावर तकतकतेपण शतकांचा
रुतून राहिलेला शेवाळ उपटून पसरण्यात मग्न.
अर्पण करून टाकलेल्या इंद्रियाच्या जागी
त्यांनी आपल्या सोयीप्रमाणे
सोयींच्या अभावात रित्या केलेल्या जन्मांचा
मागोवा घेत सूर्यफूलं यावीत म्हणून
आरंभलेली पूजा
पण डोळ्यांनी काहीतरी वेगळंच कल्पिलेलं होतं–
समुद्रपक्षी फार भोळे आहेत
त्यांना फसविता येते...
त्यांचेकडून काहीही काढून घेता येते
फक्त स्तोम माजवून झिंग येईल
अशी व्यवस्था व्हायला हवी.
जे डोळे जागरूक असतात
त्यांना सगळं काही दिसू शकते !
आणि त्यांना पाहताही येते सत्यातले असत्य.
गस्त घालणाऱ्या डोळ्यांनी हेरून ठेवल्या आहेत
समुद्रपक्षांच्या व्यथेच्या खायी
त्यात कुरतडणारा भयाण काळोख,
उद्या याच काळोखाच्या भांडवलावर
प्रचंड वादळ उठविणार आहेत समुद्रावर
मग उफाळून येणाऱ्या लाटांवर उभे ठेवून
बळी देणारेत समुद्रपक्षाचा,
एव्हाना ते पोरके झालेले असणार.
लाटांच्या अंतर्यामात झिजणाऱ्या कारस्थानांचा
एक अक्षरही कळणार नाहीये
आणि समुद्रपक्षांनी हरविलेली इंद्रियेही
परत मिळणार नाहीये...

सुरेश गांजरे / आलेख

हरेक वळणावर
सारेच रस्ते तुटत गेलेत.
मार्गावरचे फलकच
मार्ग चुकवत गेलेत.
डोळस श्रद्धेच्या प्रवाहात
आमचे देव वाहत गेलेत.
निरागस चेहऱ्यांस ह्या
मुखवटे हुकवत गेलेत.
वैऱ्यांचा प्रश्नच नाही
मित्रच अखेर टाळत गेलेत.
हवी कशाला वेरीज —
वजावाकी
अखेर शून्यच सारे
उरत गेले.
वैशाखी आयुष्यात दोस्त हो,
कोरडेच मेघ बरसत गेलेत.
किनारेच लाटांना कसे
सारखे दुरावत गेलेत !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

नरेंद्र बोडके / अत्यंत

अत्यंत लांब आहेत समोरचे रस्ते
कुठपर्यंत घेऊन जाणार आहेत
कुणास ठाऊक? रक्त कापूर होऊन जळतेय आसमंतात;
सर्वदूर
मरणाच्या शोकगीताचे देखणे सूर
संध्येचे सुंदर रंग एका भग्न रात्रीच्या दिव्यावर
भुरूभुरू जळाले
त्याची आठवण फुलझाडासारखी तेवते आहे
माझ्या मनात;
अश्रूंची एक खडकाळ लाट फुटली माझ्या आयुष्यावर
त्यात वाहून गेले
एक देऊळ आणि देवळालगतचे एक घर
काही आठवणे हाच जर गुन्हा असला,
तर पुष्कळच आठवता येईल मला
शाप देणाऱ्या घंटांचे देऊळ,
पांढऱ्या पराभवाचा साईबाबा
आणि एक वळणावळणांचा रस्ता किंवा
फिक्कट प्रकाशातील
माणसाचे दु:खी चेहेरे.
आता कसे हाडामासातून श्वासातून स्पंदन पावतेय
एक अत्यंत क्रूर सार्वभौम आकाश;
चित्त्यासारखी झेप घेऊन
कुणीतरी रुतविलीत आपली नखे
पाशवीपणे माझ्या शरीरात
कितीवेळा पाहिले दु:खांचे सूर्यास्त तरी अजून
धगधगतेय चिता काळजासकट सर्वस्व पेटविणारी
हे रस्ते पुन्हा पुन्हा वळतात माझ्यापर्यंत,
आणि मी अत्यंत दूर स्वत:पासूनच...

सुभाष सावरकर / स्वप्नपक्षी

ग्रहगोल तारकांचा मांडून हा पसारा
मी सैरभैर येथे धुंडाळतो किनारा।
मी ऐकले कळ्यांचे उच्छास गंधधुंद
दवभारल्या फुलांचे गहिरे अनंगरंग
अस्वस्थ का तरीही हा ताटवाच सारा ?
प्रत्येक मोहराचा वस एकदा पुकारा !
तूफान रौद्र लाटा भांगात माळणारे
निभ्रान्त ध्येयवेडे तांडे मुसाफिरांचे
दरिया कवेत घ्याया ज्यांनी दिला दुजोरा
ओहोटीत त्या शिडांचा गेला निघून वारा !
आभाळ तुंवलेले ना वीज नाही धारा
नि:शब्द स्फोट कंठी ओठंगला निवारा
भयभीत काफिल्याचा हरवून शब्द गेला
दूरस्थ तारकेचा विझला कसा इशारा ?
ते अंगसंग सरले, ओढाळ गीत विरले
फेसाळ सागराचे आव्हान दीन उरले
ठिणग्या उगाळणारे अगतीक आज तारे
सारे विषण्ण वारे धुंडाळती किनारे
मी हा असा जटायू निर्वैर झुंजलेला
अभिमन्यु मंत्रवेडा व्यूहात संपलेला
रानात रानभूली दिङ्मूढ जाहलेला
क्षितिजात झेप कैसी— ना पंख ना पिसारा !
आयुष्य हे उपाशी बेचैन स्वप्नपक्षी
मागे वळून पाही— गळला कुठे पिसारा ?

⊗ ⊗ ⊗

30389
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 24.2.98
33
विदर्भ सा

युगवाणी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

—विक्रीस तयार असलेली प्रकाशने—

पुस्तके	रु. पैसे
१. कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह, भाग २	६-००
२. The Vedasthan or the Ancient Home of the Indo Aryans : ले. कै. डॉ. तु. ज. केदार	६-००
३. प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	३०-००
४. मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	३२-००
५. लोकसाहित्य संपदा : ना. रा. शेंडे	१२-००
६. केशवसुत वाङ्मय सूची : सौ. उज्वला अयाचित	२-००
७. कै. डॉ. य. तु. देशपांडे : वाङ्मय सूची	२-००
कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध	
१. गोविंदाग्रज यांचा कवी या नात्याने विचार : कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	१-००
२. गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगतः : प्रा. श्री. मा. कुळकर्णी	१-००
३. सुतारीचे नव्हे, एकतारीचे बोल : द. वि. तेंडूलकर	१-००
४. गडकऱ्यांची खरी भूमिका : प्रा. भ. श्री. पंडित	१-००
५. गडकऱ्यांची नाट्यशैली : प्रा. रू. पां. पांजणकर	१-२०
६. गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टी : वसंत वरखेडकर	१-२०
अमराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता सहज-सोपे पुस्तक	
७. हिन्दी मराठी भाषा प्रवेशिका, द्वितीयावृत्ती : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४-००
८. तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ (प्रथम आवृत्ती) डॉ. र. श. केळकर	४-००

मागणीकरिता संपर्क साधा :

सरचिटणीस,

विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-१२.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२.

मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ